
मला काही सांगायचंय
भाग ३
प्रफुल्ल शेजव

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे


प्रफुल राजेंद्रराव शेजव

लिखित


कादंबरी

# मला काही सांगाचंय... भाग 3

## मला काही सांगाचंय... भाग ३

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मला काही सांगाचंय... भाग ३ (कादंबरी)

लेखक : प्रफुल राजेंद्रराव शेजव

शिक्षण : MBA

ई मेल : praful101shejao@gmail.com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ९ सप्टेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .

# मला काही सांगाचंय... ( भाग तीन )

प्रिय रसिक वाचकांनो,



आपणा सर्वांचे खूप खूप आभार..."मला काही सांगाचंय..."या कादंबरीच्या पहिल्या आणि दुसऱ्या भागास इतकं भरभरून प्रेम दिल्याबद्दल धन्यवाद! कादंबरी लिहितांना असा काही प्रतिसाद मिळेल याची काहीएक जाणीव मला नव्हती... यामुळेच कादंबरीचा पहिला भाग २०१६ मध्ये लिहून मी जवळजवळ लिखाण बंद केले होते पण कदाचित नियतीला माझ्याकडून अजून काही तरी अपेक्षित होतं म्हणूनच स्पर्धा परीक्षा क्लासच्या निमित्याने "विशाल इंगळे" यांच्याशी काही दिवसांपूर्वी माझी भेट झाली... ते स्वतः एक लेखक आहेत. (http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/ha_kshan_vishal_ingle. pdf) त्यांच्याकडून मला ई साहित्य प्रतिष्ठान बद्दल माहिती मिळाली आणि सहज म्हणून मी पहिल्या भागाची सॉफ्टकॉपी ई साहित्य टीमला ईमेल केली आणि ई साहित्य टीमने कादंबरीची संकल्पना आवडली असल्याचे कळविले... पहिला भाग १० डिसेंबर २०१८ रोजी प्रकाशित करण्यात आला."मला काही सांगाचंय..."या कादंबरीचा ई बुकच्या रूपाने एका रसिकाडून दुसऱ्या रसिकाकडे प्रवास सुरू झाला... भाग १ ला आपण रसिकांनी दिलेली पसंती आणि प्रतिसादाने मला प्रोत्साहित केले... पुढचा भाग कधी प्रकाशित होईल अशी रसिकांकडून विचारणा केली जात होती... रसिकांचे कित्येक ईमेल आणि फोन कॉल्स मला स्वस्थ बसू देत नव्हते म्हणून रोज ठराविक वेळ लिखानाकरिता राखीव ठेवून भाग २ लिहून पूर्ण केला आणि २६ फेब्रुवारी २०१९ रोजी दुसऱ्या भागाचे प्रकाशन करण्यात आले, आपण चाहत्यांची आवड जपून ठेवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आणि आणखी पुढे काय? या अपेक्षित प्रश्नाची मी वाट पाहून होतो ... निश्चितच माझी अपेक्षा पूर्णत्वास आली,

आपण रसिकांची उत्कंठा वाढतच गेली... तर या भागाकरिता आपणास वाट पाहावी लागली याकरिता मला नक्की माफ कराल हि अपेक्षा करतो... रसिकहो आपणा चाहत्यांची प्रतीक्षा संपली... आपणांस आवडेल या अपेक्षेने भाग ३च्या प्रवासाला सुरुवात होत आहे...

आपणा पर्यंत पोहोचविण्यास मला खूप आनंद होत आहे, प्रस्तुत आहे...

"मला काही सांगाचंय... भाग ३"

मी आणि रसिक वाचक यांच्यातील दुवा म्हणजे ई साहित्य प्रतिष्ठान, संपूर्ण ई साहित्य टीमचे कठीण परिश्रम आणि माननीय सुनिल सामंत सर यांचे मार्गदर्शन यांच्या माध्यमातून आपली ओळख झाली... यासाठी आणि तिन्ही भागाच्या अप्रतिम मुखपृष्ठाकरिता टीमचे मनःपूर्वक आभार...

धन्यवाद!


## रसिक वाचकांकरिता एक विनंती :-


प्रिय रसिक वाचक,

कादंबरीचा पहिला भाग प्रकाशित होऊन जवळपास ६ महिने झाले आणि दुसरा भाग प्रकाशित होऊन ४ महिन्यांचा कालावधी लोटून गेला म्हणून आपण वाचकांना एक नम्र विनंती करतो की भाग ३ वाचायला सुरूवात करण्यापूर्वी एकदा भाग १ आणि २ वरून ओझरती नजर टाकल्यास या भागाचे वाचन आणखी मनमोहक तसेच मजेशीर वाटेल... नक्कीच वाचनाचा जास्त आनंद उपभोगता येईल... दोन्ही भागांच्या लिंक खाली दिलेल्या आहेत...

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mks1_praful_shejao. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mks_2_praful_shejav. pdf



## अनुक्रमणिका :-


२१. आनंदाश्रू

२२. एकांत

२३. आठवण

२४. अनपेक्षित

२५. सोनेरी क्षण

२६. जाणीव

२७. आभास

२८. गतकाळ

२९. निमित्त

३०. नशीब

३१. स्वप्न आणि सत्य

३२. भेटीची ओढ

## २१. आनंदाश्रू

आजचा दिवस कुमारच्या कुटुंबासाठी आणि मित्रांसाठी परत एकदा नव्याने आनंदाचे क्षण घेऊन आला होता. कुमारचा अपघात झाला असे कळल्यापासून ते त्याला ऑपरेशन थिएटर मधून ICU मध्ये परत आणल्यावर सर्वांना काळजी वाटत होती आणि आज सकाळी जेव्हा कुमारला ऑपरेशन थिएटरला नेलं तेव्हा त्याचे आई वडील, प्रशांत आणि मित्र परिवार 'कुमार सुखरूप परत यावा, त्याला दीर्घ आयुष्य लाभावे, तो लवकर पूर्ण ठीक व्हावा' अशी मनोमन प्रार्थना करत होते, डॉक्टर देवांश वैद्य व त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नांना यश आले होते तर कुमारचे आई वडील, भाऊ, मित्र परिवार यांच्या प्रार्थनाचं फलित झालं होतं, कुमारचं ऑपरेशन व्यवस्थित पार पडले होते आणि आज डोळयात आलेली आसवं दुःखाची जाणीव स्वतःबरोबर वाहून नेत होती, कुमारला जीवनदान मिळालं म्हणून तेच आसवं आज आनंदाची अनुभूती देत होती...

कुमारचं ऑपरेशन व्यवस्थित पार पडले आणि तो आता धोक्यातून बाहेर आला, त्याला सध्या आरामाची आवश्यकता आहे म्हणून कुणीही त्याला भेटू शकले नाही तर तो लवकरच बरा होईल, काळजीचं विशेष कारण नाही असे डॉक्टरांनी सांगितले. असं सुजितने तिला फोन करून सांगितलं होतं पण फोनवर बोलतांना सुजितच्या मनात आलेला प्रश्न तसाच राहीला आणि तिच्या मनातलासुध्दा... मोबाईल वरचा संवाद संपल्यावर तिने मोबाईल बाजूला ठेवला, कुमारने डायरीत अजून काय लिहिलं याचं कुतूहल प्रत्येक क्षणाला वाढतच होत... मनात येणारे विचार दूर सारून तिने पुन्हा डायरी उघडून वाचायला सुरुवात केली...

कुमारने लिहिलं होतं...

*माझं बारावीचं वर्ष... माझं कॉलेज सुरु झालं होतं आणि तिचंसुध्दा, मग काय सोबतच कॉलेजला जाणं, येतेवेळी सोबतच घरी येणं असा रोजचा दिनक्रम... आमची मैत्री आणखी घट्ट झाली, तिचा सहवास मला जास्तच आवडायला लागला होता पण मनात प्रेम वगैरे असं काहीएक नव्हतं... खरं तर मला तोवर प्रेम म्हणजे काय? हेसुध्दा ठाऊक नव्हतं... पण ती सोबत असली की बाकी कशाचं भान उरत नव्हतं, मी कित्येकदा तिला पाहत सर्वकाही विसरून जात होतो.. तिचं बोलणं झालं की तिला उत्तर द्यायचं राहून जायचं... तिच्याशी बोलतांना , पंख पसरून पाखरांनी आकाशात उंच भरारी घेतली असा देखावा जणू नजरेसमोर आहे आणि एका क्षणाला पापणी न लवता त्यांना पाहत राहावं असं भासत होतं... तसंच काहीसं ती समोर आली की होत होतं.*

*एक दिवस... मला घरून कॉलेजला निघायला जरा उशीर झाला होता.. ती समोर गेली असेल या विचाराने मी घाईघाईत सायकल चालवत जात होतो... पण ती समोर दिसत नव्हती, थोड्या वेळेसाठी वाटलं की ' बहुतेक ती आज कॉलेजला येणार नाही... कदाचित काही कामं असेल म्हणून लवकर गेली असेल... आज जाता जाता भेट होणार नाही... ' असं मनात काहीसं चाललं होतं... मी सायकल हळू चालवत वळण घेतलं आणि समोर बघतो तर काय? ती समोरच होती... तिने सायकल थांबवून स्टँडवर उभी केली होती, ती खाली उतरून काहीतरी करत असल्याचं दुरून दिसत होतं... काहीतरी गडबड नक्की झाली मला समजलं... मी तिच्याजवळ पोहोचेपर्यंत ती दोन तीन वेळा त्रासून एक पाय जोरात रस्त्यावर आपटत इकडे तिकडे बघत असल्याचं दिसून आलं...*

*तिच्या जवळ जाताच मी सायकल थांबवून नेहमीप्रमाणे एक पाय खाली टेकवून थांबलो... ती खाली वाकून काहीतरी करत होती पण ती काय करत होती तिकडे माझं लक्ष नव्हतं तर तिच्या कपाळावर आलेले थेंब सूर्यकिरणाच्या प्रकाश्याने किती चमकत होते आणि एकटक*

*खाली पाहत असल्याने तिच्या पापण्या कितीतरी पटीने जास्त मोहक वाटत होत्या... तिथं माझं सारं लक्ष लागलं होतं... तिच्या चेहऱ्यावरून नजर काढू नये असं वाटलं होतं.*

*इतक्यात ती बहुतेक स्वतःशीच पुटपुटली*

*"छे! आता काय करु? "म्हणत तिने वर पाहिलं...*

*"गुड मॉर्निंग, कितींप्रिया"*

*"जाता जाता नसती उठाठेव, कसली गुड मॉर्निंग?"*

*जसं मला काहीच माहित नाही असं दाखवत मी म्हणालो होतो..."का बरं? काय झालं?"*

*"तुला काय दिसत नाही? सायकलची चैन पडली..."*

*"अस्स होय... मला वाटलं काहीतरी हरवलं... ते तु शोधत आहे..."*

*त्यावर काहीएक न बोलता, ती चैन बसविण्याचा प्रयत्न करत होती... हात खराब होऊ नये म्हणून अगदी बोटांच्या टोकाने चैन पकडून पैडलच्या चाकावर त्या लहान लहान खाच्यावर चैन चढविण्याचा तिचा अपयशी प्रयत्न सुरूच होता..*

*तिला कदाचित वाटलं असेल की मीच समोर होऊन तिला मदत करेल पण मी मनात विचार केला की जरावेळ तिलाच प्रयत्न करू द्यावा... बघू तिला जमते कि नाही..? गंमत म्हणून नाही तर मागे पुढे परत कधी अशी वेळ आली तर तिला चैन बसविता यायला पाहिजे...*

*पण तिला कदाचित वाटलं असेल की मी जाणून बुजून तिची फजिती पाहत तिथं थांबलो... तिला चैन चढवायला जमतच नव्हतं मध्येच एखादा तीक्ष्ण नजरेचा कटाक्ष माझ्याकडे बघून ती पुन्हा प्रयत्न करत होती पण ' मदत कर ' असं काही म्हणत नव्हती, मी आणखी काही वेळ वाट पाहिली पण तिला काही ते जमलं नाही... एवढ्यात मला समजलं की ती काही मदत मागणार नाही आणि मी एक नजर घड्याळ पाहिल्यावर कॉलेजला पोहोचायला उशीर होईल असे माझ्या लक्षात आले... तरी मी तिला म्हटलं...*

*“जमेल, जमेल पुन्हा एकदा प्रयत्न कर...”*

*तेव्हा ती जरा रागातच बोलली होती,”तू जा, तुला उशीर होईल...”*

*मग मीच माझी सायकल बाजूला उभी केली...*

*“तू जरा ऊठ, मी बघतो... जमते कि नाही”*

*ती एकही शब्द न बोलता झटकन बाजूला झाली... घामाने चिंब भिजलेला चेहरा ओढणीने पुसून बाजूला उभी राहून पाहत होती... जसा आधी मी उभा होतो तशीच...*

*मी पुन्हा एकदा किती वाजले म्हणून घड्याळ पाहिलं... 5 - 10 मिनिटं आणखी थांबलो तरी विशेष असा जास्त उशीर होणार नव्हता म्हणून मी जरा धडपड करावी लागत आहे*

*असं दाखवून  रुमालाने घाम पुसला आणि जोर लावून कशी तरी चैन चढवली... तिला समाधान वाटलं... पण चेहऱ्यावर राग तर होताच मग तिने"थॅंक यू कुमार"एवढं म्हटलं... मी मानेनेच प्रतिसाद दिला होता...*

*माझे हात ऑइल लागल्याने खराब झाले होते, समोरच काही अंतरावर हातपंप असल्याने मी तिकडे गेलो तर ती लगोलग माझ्या पाठीमागेच आली आणि हात धुवायला मदत म्हणून तिने मला मदत केली... आम्ही कॉलेजला जायला निघालो होतो... काही वेळातच कॉलेजला पोहोचलो... दोघेही आपआपल्या वर्गात गेलो आणि परत येतांनी सोबतच घरी आलो होतो...*

*मला घाई झाली होती कधी एकदा कबीरला जाऊन भेटतो आणि आज झालेली गंमत त्याला सांगतो... घरी आल्यावर मी सरळ कबीर जवळ गेलो...*

*"कबीर... कबीर..."धावतच त्याच्याजवळ पोहोचलो...*

*"तुला सांगू, कबीर... आज काय झालं??"*

*माझा दोस्त हलकेच पान हलवून जणू मला विचारत होता..."आज नवीन... कामगिरी बजावली..?"*

*मी त्याला टेकून बसलो आणि जातांनी जे काय झालं ते सर्व त्याला सांगितल्यावर मला हसायला आलं होत...*

*कबीर... तुला माहित आहे!*

खरं तर मी जोरात एक उलटं पैडल मारलं असतं आणि एक दोन सेकंदात चैन परत ठीक झाली असती... मी असाच इतक्या वर्ष्यांपासून सायकल चालवत नाही... माझ्या सायकल ची कधी चैन पडली तर मी चालू सायकल मध्येच भराभर उलटे पैडल फिरवून चैन चढवून घेत होतो... पण तिची त्यावेळी थोडं मस्करी करावं असं वाटलं आणि मी हळूहळू चैन चढवित असतांना पाहून कदाचित तिलासुध्दा पुन्हा कधी चैन पडली तर आता अश्यावेळी काय करायचं ते तिला नक्की समजलं असेल...

जरावेळ तसाच कबीर सोबत बसून राहिलो होतो... कधी नव्हे ते अचानक डोळे मिटले, तो क्षण पुन्हा एकदा नजरेसमोर आला आणि मी हरवलो... काही वेळाने जाग आली, सूर्य केव्हाच मावळला होता... माझ्या जिवलग दोस्ताचा निरोप घेऊन घरी परतलो...

एकदा असंच सुटीच्या दिवशी... माझा वाढदिवस नेमका त्याच दिवशी होता... सर्व मित्रांनी शुभेच्छा दिल्या... मी आनंदी होतो पण मला आणखी आनंद झाला असता जर ती मला शुभेच्छा देण्याकरिता आली असती... कबीरच्या सहवासात असतांना... मनात विचार आला, तिच्याशी मैत्री झाली, जवळपास एक वर्ष पूर्ण झालं असेल... पण अजून तिला माझा वाढदिवस माहित नाही... अन दुसऱ्याच क्षणाला माझ्या लक्षात आलं की मलासुध्दा तिचा वाढदिवस माहित नाही... मला आज माझं हसू आलं... नंतर मात्र मी ठरवलं की तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी तिचा वाढदिवस माहीत करून घ्यायचा.. पण तिला न विचारता तिच्या नकळत हे मला माहित करून घ्यायचं होतं... मग आता काय करावं आणि कसं?

बराच वेळ विचार करून मला त्यावर उपाय सुचला होता... लगेच कबीरला सांगत मी स्वतःला शाबासकी दिली आणि मोहीम सुरू झाली होती... शोध जन्मतारखेचा... ! तिचं

*कॉलेजचं ओळखपत्र मिळालं तर अगदी सहज तिचा वाढदिवस कधी आहे ते कळेल... असं वाटून गेलं आणि मी माझा प्रयत्न सुरु केला पण त्यात मला यश मिळालं नाही...*

*एक आठवडा निघून गेला पण मोहीम काही पूर्ण झाली नाही... रोजच्या प्रमाणे त्यादिवशी सोबतच दोघे कॉलेजला जायला निघालो होतो...*

*“कुमार... जातेवेळी एक काम आहे, तू सोबत येणार? तुला कॉलेजला जायला उशीर होत नसेल तर...”“हो येतो की सोबत, कुठे जायच आहे?”*

*“आपल्या शाळेत... पाच मिनिटांचे काम आहे...”*

*सायकल जोरात चालवत आम्ही शाळेत पोहोचलो होतो... सोबतच शाळेच्या कार्यालयात जाणार इतक्यात माझे दहावीचे वर्गशिक्षक समोरून येत होते म्हणून मी बाहेरच त्यांच्याशी गप्पा मारत थांबलो होतो... वर्गशिक्षक निघून गेले आणि काहीवेळात ती हातात काहीतरी घेऊन बाहेर आली... जवळ येताच तिने माझ्या हातात प्रमाणपत्र देत...*

*“कुमार... हे दोन एक मिनिट तुझ्या हातात ठेव, मी बॅग उघडते”*

*मी ते प्रमाणपत्र हातात घेऊन वाचलं*

*“हे तर बोर्ड सर्टिफिकेट आहे ...”*

*“हो.. माझं घ्यायचं राहून गेलं होतं”*

त्यावरून नजर फिरवत असता मला नकळत त्यावर तिची जन्मतारीख लिहिलेली दिसून आली... मोठ्या आणि स्पष्ट अक्षरात... त्यावेळी आश्चर्य आणि आनंदाचा गोड अनुभव आला होता...

मग आम्ही तेथून कॉलेजला जायला निघालो आणि काही वेळातच पोहोचलो... मी सवयीप्रमाणे ओळखपत्र बाहेर काढून गळयात टाकलं... मागे वळून एक नजर तिच्याकडे बघितलं आणि समोर चालत चालत वर्गात गेलो... वर्गात तास सुरु असताना मध्येच तिचा वाढदिवस मनात यायचा... अन बरंच काही... सर्व तास संपले होते, कॉलेजला सुटी झाली आणि दोघे सोबतच घरी परतलो... हात पाय धुवून सरळ कबीर जवळ, कधी एकदा आनंदाची बातमी त्याला सांगतो असं होऊन गेल होतं...

“कबीर... कबीर... तिचा वाढदिवस मला माहिती झाला... 18 एप्रिल...”

आनंदाने त्याला सर्व घडला प्रकार सांगितला होता... जरावेळ त्याच्याजवळ विसावलो..

त्या दिवसानंतर चार पाच दिवस लोटले होते... तेव्हाची गोष्ट... वर्गात दोन तास झाल्यावर 15 मिनिटांची सुटी ची बेल वाजली... नोटीस बोर्डवरची सूचना वाचतेवेळी, बाजूच्या खिडकीत ठेवलेला एक लहान बॉक्स माझा धक्का लागल्याने खाली पडला... मी तो तसाच टाकून तेथून जाऊ शकलो असतो पण मी तसे केलं नाही. ऑफिसात आतमध्ये जाऊन तो बॉक्स उचलून टेबलवर ठेवला आणि त्या बॉक्समधील खाली पडलेली ओळखपत्र परत त्यात टाकत होतो... आणि योगायोग कि काय कळलं नाही तिचं ओळखपत्र माझ्या हाती लागलं. काही क्षण मी तसाच एकटक पाहत होतो... बेल वाजली अन मी भानावर आलो. पुन्हा एकदा तिचा वाढदिवस कधी? या प्रश्नाचं उत्तर नकळत मला मिळालं होतं... आता फक्त वाट होती ती एप्रिल महिन्याची, अजून

*बरेच दिवस मला वाट पाहावी लागणार होती... पण दररोज कॉलेजला येता जातांनी तिच्याशी बोलणं व्हायचं...*

*तिचा वाढदिवस माहीत करून घेण्यासाठी किती प्रयत्न केला होता आणि नकळत इतक्या सहज मनात काही नसतांना मला तिची जन्मतारीख कळली होती... तिचे ओळखपत्र अचानक हाती आल्याने पुन्हा एकदा तिचा वाढदिवस कधी आहे ते माहित झालं होतं, मी पोट धरून हसत होतो आणि हळूच माझ्या डोळ्यात आसवं चमकली... आनंदाश्रू... !*

असं कुमारने लिहिलेलं वाचत असता ती जरावेळ डायरी तशीच ठेवून स्वतःशीच बोलत - मनात विचार करायला लागली...

## २२. एकांत

स्वतःशी तिचा असा संवाद सुरु असता ती त्या भावविश्वात मग्न झाली... कितीतरी विचारांचे बाण प्रत्येक क्षणाला तिचं मन विचलित करू लागले... मनात अचानक आलेले विचार घर करू पाहत होते पण दुसऱ्याच क्षणी आणखी पुढे काय लिहिलं असणार? असं तिच्या मनात आलं आणि तिने समोर वाचायला सुरुवात केली...

*रविवार दिवस होता... बराच वेळ पुस्तक वाचून नोट्स काढून घरच्या घरी जाम कंटाळा आला होता, मग काय सुजितला भेटण्यासाठी सायकल घेऊन निघालो पण मनात ती नव्हतीच कारण सकाळपासून फक्त आणि फक्त अभ्यास करत जवळ जवळ अर्धा जास्त दिवस निघून गेला होता... तर म्हटलं चला सुजितने आज काय केलं? त्याला जरा भेटून विचारावं... म्हणून सहज निघालो होतो...*

*मी आपला माझ्या धुंदीत सायकल चालवत जात होतो... तर समोर ती होतीच... तिच्या हातात एक कागद होता... मी तिला टाळत पटकन निघुन जायचा प्रयत्न केला पण जवळून जाताच... हाक ऐकू आली...*

*"कुमार..."*

*जास्त दूर न गेल्याने मी आवाज ऐकू आला नाही असा बहाणा करू शकलो नाही... म्हणून मागे परतून आलो होतो... तिच्या जवळ जाऊन सायकल उभी करून सवयीप्रमाणे एक पाय खाली टेकवून --*

*"किर्तीप्रिया, तू आवाज दिला?"*

*“नाही, मी आवाज दिला नाही ..”*

*“खरंच तू आवाज दिला नाही ...?”*

*“नाही, तुला भास झाला असेल..”*

*"...”जरावेळ विचार करत - हिने मला आवाज दिला होता की मला भास झाला*

*“बरं येतो मी...”जरा गोंधळून बोललो*

*“हं, ये..”इतकंच बोलून ती हसत होती*

*“नक्की तू आवाज दिला नाही...”खात्री करून घ्यावी म्हणून मी पुन्हा एकदा विचारलं होतं...*

*“अरे हो रे, इतकं गोंधळायला काय झालं?”हसत हसत ती म्हणाली होती.*

*“मग तू नाही का म्हटलं?”*

*“जरा गंमत केली रे..”*

*“ठीक आहे... एक वेळ माझी पण येईल..”*

*“हो वाट बघ...”*

*“ते जाऊ दे, आवाज का दिला?”*

*तो कागद माझ्या हातात देऊन”हे बघ MS - CIT क्लास सुरु होणार आहे..”*

*“अस्स यासाठी...”*

*“मी क्लास करायचे असं ठरवलं आहे, मी अकरावीला आहे आणि कॉलेज करून वेळ असतोच ना मग सोबत सोबत MS CIT करून टाकावं म्हणते..”*

*“वा छान...”*

*“छान काय छान, तू सुद्धा क्लास लाव असं सांगण्यासाठी मी तुला थांबवलं..”*

*“अस्स होय... कळलं...”*

*“मग उद्या माझ्या सोबतच चलशील, कॉलेज झाल्यावर परत येतेवेळी आपण ऍडमिशन करू..”*

*“सॉरी पण मला क्लास लावता येणार नाही...”*

*“का बरं?”*

*“बारावीचं वर्ष पूर्ण झाल्यावर MS CIT करायचं मी असं ठरवलं...”*

*“कुमार... प्लिज, तुला माहिती आहे ना मी आपण का सोबत क्लास करू म्हणते..?”*

*“का?”*

*“नवीन ठिकाणी कुणी ओळखीचं सोबत असलं तर धीर राहतो आणि...”*

*मी विचारायला नको होतं पण न राहवून विचारलं...”आणि... आणि... काय?”*

*“काही नाही... तू सोबत क्लास लावणार कि नाही? ते सांग...”जरा रागात बोलली होती.*

*“पुन्हा एकदा सॉरी, पण माझं जमणार नाही..”*

*“बरं, ठीक आहे...”*

*मला तिथं थांबणं जमलं नव्हतं ”चल,मी निघतो, ठीक काम आहे...” म्हणत मी तिथून निघालो होतो...*

*सुजितला भेटून परत आलो आणि सरळ कबीरला जाऊन सारं सांगितलं... मी खरंच क्लास लावू शकत नव्हतो बारावीची सराव परीक्षा काही दिवसांत होणार होती आणि दोन अडीच महिन्यात शेवटची परीक्षा...*

*दुसऱ्या दिवशी...*

*मी सायकल फिरवून रस्त्याने जात होतो...*

*“कुमार...”*

*मागे फिरून पाहिलं तर तीच होती... तसं आवाजावरून मला कळलं होतं.*

*“किर्तीप्रिया.. तू इथे कशी काय?”*

*“हा प्रश्न मी तुला विचारायला हवा...”*

*“नोटबुक घ्यायचं होतं...”*

*“मला वाटलं तू माझ्यासोबत ऍडमिशन घेण्यासाठी आला...”*

*“मी कालच तुला सांगितलं...”*

*“हो, ठीक आहे...”*

*“तुझा क्लास इथे आहे का?”*

*“हं...”*

*“चल इथपर्यंत आलो आहे तर आतसुध्दा येतो...”*

*दोघेही MSCIT सेन्टरच्या आत गेलो होतो... तिचा ऍडमिशन फॉर्म भरून त्यावर फोटो लावला... रसेप्शनिस्ट कडून आवश्यक सर्व माहिती मिळवली आणि बॅच टाईम नक्की करीत फॉर्म घेऊन केबिनमध्ये जाण्याची परवानगी मागितली होती -*

*“हॅलो सर, आम्ही आत येऊ शकतो...”*

*“हो प्लिज, या ना”*

*आत गेल्यावर सरांनी समोरच्या खुर्चीवर बसायला सांगितल्यावर, आम्ही दोघेही बसलो...*

*“बोला... काय नावं आहेत तुमची?”*

*“मी कुमार... हि किर्तीप्रिया...”*

*“ok...”*

*“सर हिला ऍडमिशन पाहिजे..”*

*“बरं, तूम्ही फॉर्म भरला?”*

*“येस सर...”फॉर्म सरांना देत*

*त्यांनी फॉर्म चेक केला, फी बद्दल  आणि उद्यापासून 9:30 ते 10:30 पर्यंत बॅचची वेळ राहील असे सांगितलं होतं ...*

*"ठीक आहे, सर... धन्यवाद!"*

*...*

*आम्ही दोघे घरी जायला निघालो होतो... काही वेळातच घरी पोहोचलो आणि मी लगेच आल्याबरोबर कबीरला भेटायला आणि मनातलं त्याला सांगायला गेलो होतो...*

*सरळ त्याच्याजवळ जाऊन बसलो... जरावेळ शांतच होतो, काल तिच्याशी बोललो ते सारं आठवत होतं... तिने बराच वेळ मी सोबतच ऍडमिशन करावी म्हणून मला बदलविण्याचा प्रयत्न केला होता... पण माझा नाईलाज होता नाहीतर तिच्या सहवासात क्लासला न जाणं कुणाला नको होत...*

*थोड्या वेळाने भानावर आलो...*

*"कबीर... खरंच खूप वाईट वाटत आहे, तिला नाही म्हणावं लागलं... तेही इच्छा असून पण मी समाधानी आहे कि तिने क्लास लावला... तिने काल जेव्हा मला क्लास बद्दल सांगितलं आणि तो कागद हाती दिला तेव्हाच मी विचार केला होता... म्हणून मी आज सकाळीच कॉलेजला जाण्याआधी MSCIT सेन्टर ला गेलो होतो, क्लास चा पत्ता कागदावर होताच आणि तिथं जाऊन कळलं की जे सर तिथे क्लास घेतात ते ओळखीचेच होते.. मग मी तेव्हाच सर्व माहिती*

*मिळवली, कोर्स किती महिन्याचा, फीस, टायमिंग आणि सरांना एक फ्रेंड ऍडमिशन करणार आहे... तेव्हा सरांनी सांगितलं होत की फक्त संध्याकाळच्या बॅच मध्ये ऍडमिशन होऊ शकते असे मला समजलं पण सर ला विनंती करून एक जागा सकाळच्या बॅच मध्येच करून द्या असं सांगून, कॉलेजहुन परत येतांनी फॉर्म भरून घेऊ आणि जमल्यास सकाळी बॅच टाईम मिळाला तर उत्तम। असं सगळं आधीच बोलून घेतलं होतं..."*

कुमारने असं लिहिलेलं वाचून ती विचार केल्या शिवाय राहू शकली नाही,

डायरी तशीच हाती धरून, तिने एक नजर वर गरगर फिरणाऱ्या पंख्याच्या पात्याकडे पाहिलं... संपूर्ण घरात ती एकटीच बसून वाचत असताना तिला एकांत असल्याचं जाणवलं नाही आणि म्हणूनच आतापर्यंत एकसारखं वाचून एकदम थांबल्याने मनात येणारे विचार प्रश्नाचं रूप धारण करून वर डोकावू पाहत होते... ती एकाकी आणि त्यात भर म्हणजे घरातील शांत वातावरण यामुळे विचारांची चादर तिच्या मनावर पांघरूण ओढत होती... एक वेळ आली जेव्हा विचार प्रश्न बनून तिचे मन पूर्णपणे झाकल्या गेलं... प्रश्नांनी लवकरच तिच्या मनावर ताबा घेतला...

ती स्वतःलाच प्रश्नांमागे प्रश्न विचारायला लागली...

कोण ह्या लहान लहान गोष्टी लक्षात घेऊन दुसऱ्यासाठी जगतो?? आजच्या या स्वार्थी दुनियेत जीवनात असे काही विशेष क्षण जपून ठेवणारा कुणाला मिळतो?? कुमार... तुला समजणं कठीण आहे... कठीण म्हणण्यापेक्षा अशक्य! फक्त तुलाच ठाऊक असेल तु पूर्णपणे कोणाला समजलास... ! कदाचित तू स्वतःच तुला समजू शकतोस... अन समजला असेल...

## २३. आठवण

एकांतात असल्याने त्या अनावर प्रश्नांनी तिच्या मनावर ताबा मिळवला... पण तिचा नाईलाज होता कारण गतकाळ आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या गोष्टी एकाकी असतांना जास्त तीव्र होऊन आपला हेतू साध्य करतात... कधी विसर पडलेला भूतकाळ नजरेसमोर जुन्या आठवणी जाग्या करून मनाची समाधी लावतो... मनं बिचारं त्या आठवणींचा पाठलाग करत कितीतरी दूर प्रवास करत परत त्या क्षणी जे काय झालं, घडून गेलं, इतिहासात जमा झालं तिथं जाऊन धूळ खात बसलेल्या आपल्याच प्रतिमा, मूर्ती, सुख दुःखाचे जुने सोहळे दाखवतं अन पाहत राहतं... जणू काही पहिल्यांदाच हे सारं घडत आहे असं समजून पुन्हा ते सारं जगायला पाहत, अन आपण आपल्या मनाला भुरळ घालून त्या क्षणाच्या डोहात पुन्हा पुन्हा उडी घ्यायला लावतो... तो आपला स्वभावविशेष आहे... काही क्षण कितीही काळ लोटला, कितीही वेळा विसरणाचा प्रयत्न केला, मन कितीही घट्ट करून परत आठवण काढायची नाही असं स्वतःच स्वतःलाच बजावलं तरी आपण भूतकाळात रमायला सवड असो वा नसो... भूतकाळाच्या दिशेने वाटचाल करत त्या आठवणींचा शोध घेत नकळत जातो आणि सुख दुःख जे काय गतकाळातील आठवणींशी जुळलं असेल ते नव्याने अनुभवतो...

असंच काहीसं तिच्याशी घडतं होतं... इतरांप्रमाणे तिलासुद्धा असं का होतं आहे असा प्रश्न पडला नाही कारण ती गतकाळाशी एकरूप होऊन गेल्याने ती कुमार आणि त्यानं डायरीत लिहून ठेवलेलं आठवणींचं रहस्य यांतच मग्न होती... म्हणूनच असं अचानक एकांत असतांना आपण आठवणीत का रमतो? का भूतकाळाचा पाठलाग करतो? का काही क्षण पुन्हा जगावेसे वाटतात? एकाकी असतानाच आठवण का बरं येते? सर्वात महत्वाचं म्हणजे वर्तमानात वाटेला आलेलं दुःख जुन्या आठवणींना उजाळा का देतं?

असे प्रश्न हि तिच्या मनात येत नव्हते...

इतक्यात तिचा मोबाईल वाजला आणि ती गतकाळाचा निरोप घेऊन वास्तवात परतली... तिच्या समोरच्या टेबलवर ठेवलेला मोबाईल तिने हातात घेऊन पाहिलं तर कस्टमर केयर कडून काही नवीन ऑफर बद्दल मॅसेज आल्याचं तिला समजलं... तेव्हाच ' किती वाजले बरं? ' स्वतःलाच विचारत तिने वेळ पाहिला तर जवळ जवळ 6:30 वाजत असल्याचे तिला दिसून आले... मग पुन्हा डायरीत मोबाईल ठेवून तिने डायरी टेबलवर ठेवली आणि ती गच्चीवर जाऊन वाळायला टाकलेले कपडे काढून हॉलमध्ये आली... बेडरूम मध्ये जाऊन तिने भराभर कपडे कसेतरी कपाटात कोंबले ती परत त्या खुर्चीवर येऊन बसली... तिने डायरी हाती घेतली, निशाणी म्हणून ठेवलेला मोबाईल तसाच टेबलवर ठेवला आणि स्वतःलाच प्रश्न विचारत

' समोर आणखी काय लिहून ठेवलं, कुणास ठाऊक? '

ती पानावर बोट फिरवत वाचलेल्या ओळी पुन्हा चाळू लागली... मनातच ' हे वाचून झालं होतं... ' स्वतःलाच सांगत पुढे वाचायला लागली...

*तिला MSCIT क्लास लावून जवळपास दोन तीन आठवडे झाले होते... पण त्याचा परिणाम असा झाला की सकाळी कॉलेजला सोबत जाण्याचा योग मी हरवून बसलो होतो... जातेवेळी तिच्याशी भेट तर होत नव्हतीच पण परत येतांनासुध्दा काही दिवसांत भेट व्हायची बंद झाली होती... ती अकरावीत असल्याने तिला लवकर सुटी व्हायची तर बारावीची सराव परीक्षा जवळ आली म्हणून माझे एक्स्ट्रा चे लेक्चर्स सुरु झाले होते...*

*त्यादिवशी कबीर सोबत बोलत होतो,*

*"कबीर... या काही दिवसात मी तुझ्यापासून एक गोष्ट लपवली, तिच्याशी भेट होत नव्हती म्हणून काय करावं कि बोलणं होईल असा विचार करत असता मला एक मार्ग सुचला*

*आणि नकळत मी तसा वागलो... मी आजवर असं काही केलं नव्हतं पण फक्त तिची भेट व्हावी म्हणून पहिल्यांदा लेक्चर्स बुडवले... तिला सुटी झाली तेव्हाच मी पण क्लास मधून बाहेर पडलो आणि सोबतच घरी आलो..."*

*तेव्हा जसा एक जिवलग मित्र आपल्या दोस्ताला सांभाळून घेतो तसंच काहीसं मला जाणवलं म्हणूनच मी चूक झाल्याचं कबूल केलं...*

*"कबीर... खरं तर या एकाच आठवड्यात मी चार दिवस सारखे लेक्चर्स बुडवले... तुझ्यापासून मला लपवून ठेवणं बरोबर वाटतं नव्हतं आणि मनातच फार मोठी चूक झाली असे वाटून माझं मन मलाच खात होतं पण मी तुला वचन देतो पुन्हा माझ्याहातून असं होणार नाही..."*

*एक दोन दिवस गेले की नवीन वर्ष्याला सुरुवात होणार होती... मी मागच्या वर्षी तिच्या घरी जाऊन तिला नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या होत्या... मनात असं का आलं होत? माहीत नाही पण मला वाटलं मी तिला शुभेच्छा दिल्या ते तिला आठवण असेल का?... कदाचित नसेल...*

*मला कल्पना सुचली, यावेळी नुसतं हॅपी न्यू इयर असं नाही म्हणायचं तर मस्तपैकी छानसं ग्रिटींग कार्ड बनवून तिला विश करायचं असं मी ठरवलं होतं... दुसऱ्या दिवशी दुपारी तीन तास खर्च करून ग्रिटींग कार्ड तयार केलं... असं पहिल्यांदा ग्रिटींग बनवलं नव्हतं पण इतका वेळ घेऊन आतापर्यंत बनवलेल्या ग्रिटींग कार्ड पैकी सर्वांत सुंदर, आकर्षक असं प्रथमच तयार झालं होतं...*

*ते ग्रिटींग कार्ड पुन्हा पुन्हा पाहण्यात तास न तास निघून गेले... पण अजून एक दिवस नवीन वर्ष सुरु व्हायला बाकी होता...*

*मी हि नवीन वर्ष्याची, नवीन ग्रिटींग ची आणि नवीन कल्पनेची नवीन बातमी कबीरला सांगितली होती... "कबीर... बस उद्याचा दिवस गेला की पर्वा नवीन वर्ष... मी कॉलेजला जातांनी तिला ते देणार.."*

*मी जरा जास्तच आनंदी होतो...*

*नवीन वर्षाच्या आधीचा दिवस उगवला आणि मावळला...*

*1 जानेवारी। नवीन वर्ष्याची नवी पहाट उगवली... मी तयार होऊन लवकर म्हणजे तिच्या क्लासच्या वेळेला घरून निघालो होतो... वाटेतच तिला भेटलो...*

*"गुड मॉर्निंग, किर्तीप्रिया"*

*"गुड मॉर्निंग, कुमार.."*

*मी तिला शुभेच्छा देणार तोच...*

*"हॅपी न्यू इयर..."तीच म्हणाली*

*"हॅपी न्यू इयर टू यू..."*

*"किर्तीप्रिया, दोन मिनिटं थांब जरा.."*

*“काय झालं? कुमार...”*

*“थोडं कामं आहे..”मला तिला ग्रिटींग कार्ड द्यायचं होतं जे मी माझ्या बॅगमध्ये एक नोटबुकच्या आत कार्ड ला घडी पडणार नाही म्हणून एका जाड कवर लावून ठेवलं होतं..*

*दोघेही थांबलो... मी बॅग उघडून ग्रिटींग कार्ड ठेवलेलं नोटबुक शोधत होतो पण ते नोटबुक काहीकेल्या मिळतच नव्हतं... अन माझी इच्छा तशीच राहिली, निराशा झाली...*

*“काय झालं? कुमार... काय शोधत होता..?”*

*मला कळेना आता तिला काय सांगावं आणि कसं?*

*“काही नाही. चल आपण जाऊया..”*

*“अच्छा नवीन वर्ष्याची सुरुवातच मस्करी करत करायचा विचार होता तर..”*

*नाईलाजाने हसतच तिचं म्हणणं मान्य करावं लागलं होतं पण त्यापेक्षा जास्त वाईट वाटतं होतं की इतकी उठाठेव करून ग्रिटींग कार्ड बनवलं... तिला देताच आलं नाही... व्यर्थ सारं व्यर्थ!*

*नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी असं झालं होतं... ग्रिटींग कार्ड होत कुठे तर कोण्या एक मित्राने नोट्स करिता आदल्या दिवशी नोटबुक मागितलं होतं आणि मी बावळट, ग्रिटींग कार्ड त्यात असल्याचं विसरून लगेच त्याला नोटबुक देऊन टाकलं होतं... मला नोटबुक त्याचदिवशी परत मिळालं पण तिच्याशी पुन्हा परत येतेवेळी भेट झाली नाही कारण मी कबीरला वचन दिलं होतं की आता कधीच लेक्चर्स बुडवणार नाही... परत आल्यावर तिच्या घरी जाऊन तिला ग्रिटींग*

*द्यायचं म्हटलं तर संपूर्ण दिवस निघून गेला होता... असं सायंकाळी घरी जाऊन नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा म्हणून ग्रिटींग कार्ड देणं ह्श्याच निमित्त झालं असतं... कदाचित?*

*कबीरला आजची फजिती झाल्याचं सांगितलं आणि ग्रिटींग कार्ड तसंच ठेवून द्यावं लागलं... नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी असं झाल्याची आठवण म्हणून... !*

तिने हळूच डायरी बंद केली, तशीच हाती धरून डायरी मांडीवर ठेवून ती जरा मागे खुर्चीत सरकून बसली... एकमेकांचा सतत पाठलाग करणाऱ्या त्या पंख्याच्या पात्यांकडे पाहून नकळत मनात नसतांना तिला हसू आलं... कुमार एका झाडाला ह्या साऱ्या गोष्टी सांगायचा... अन नवीन वर्ष्याची अशी काही वेगळीच सुरुवात झाली होती... तिला एव्हाना समजलं की कुमार इतरांपेक्षा कितीतरी पटीने भिन्न असून जर तो झाडाला मित्र बनवू शकतो तर त्याच्याकरिता अशक्य काय होतं???

इतक्यात नेहमीचा आवाज असून त्यावेळी वाजलेली दाराची बेल तिला जास्त कर्कश वाटली बहुदा आतापर्यंत शांततेने डायरी वाचत असताना, विचार करत असताना तिला इतर सर्व गोष्टीचा विसर पडला होता...

पटकन भानावर येऊन ती उठून उभी झाली, घाईघाईत डायरी तशीच टेबलवर ठेवून ती दाराजवळ गेली आणि तिने दार उघडलं...

“हॅलो माय ब्युटिफुल वाईफ...”

तिने त्याच्या हातातील बॅग आणि टिफिन तिच्या हातात घेतला...

“घरात तर या आधी”

बॅग आणि टिफिन घेऊन ती बेडरूमकडे जायला लागली... तिने चालता चालता टेबलवर ठेवलेली डायरी उचलली, टिफिन तिथंच ठेवून ती बेडरूम मध्ये गेली आणि डायरी नाईट लॅम्प जवळ ठेवली... बॅग रोजच्या जागेवर म्हणजे बेडजवळच्या एका कपाटात ठेवली... ती हॉलमध्ये परत आली...

“तुम्ही आल्या आल्या सोफ्यावर का बसलात? बरं नाही वाटतं का?”

“सहज बसलो, मी ठीक आहे...”

“चला तर हातपाय धुवून घ्या... मी मस्तपैकी चहा बनवते...”

त्याने हातपाय धुवून घेतले, टॉवेलने पुसून तो परत सोफ्यावर येऊन बसला... तिने दोन कप चहा आणि पाणी आणले... मग दोघे सोबत चहा घेत असता गप्पा गोष्टींना सुरुवात झाली...

## २४. अनपेक्षित

इकडे या शहरात -

जेथे कुमार, त्याचे कुटुंब आणि मित्र परिवार सर्व जण असलेल्या ठिकाणी डॉ. वैद्य यांच्या दवाखान्यात -

ऑपरेशन यशस्वीपणे पार पडले होते म्हणून सर्वजण तेवढ्यापुरते समाधानी होते पण कुमार अजून ICU मध्ये असल्याने सर्वांना चिंता वाटत होती आत कुमार कसा असेल? त्याला आणखी किती वेळ भेटता येणार नाही? असे प्रश्न सर्वांच्या मनात मागे पुढे येत होते खरं तर ऑपरेशन थिएटरचा तो लाल दिवा जेव्हा बंद झाला होता आणि त्याचबरोबर ऑपरेशन पार पडलं होतं याची कल्पना कुणालाच नव्हती... कारण तेव्हाही सर्वजण अश्याच कोणत्या ना कोणत्या विचारात बुडून गेले होते, जेव्हा ऑपरेशन थिएटरचे दार उघडून त्याला बाहेर आणले होते तेव्हा त्याचे आई वडील, प्रशांत इतर सर्व जण त्या बेडच्या दिशेने गेले होते... त्याचे आई वडील तिथून जवळच उभे होते म्हणून दोन तीन पाऊल पुढे जाऊन ते लगेच त्याच्या जवळ पोहोचले... कुमार बेडवर निपचित पडलेला, डोक्याला पांढऱ्या पट्ट्या बांधलेल्या, हाताला सलाईन अजूनही तशीच लावलेली... नर्स त्याला बेडवरून त्याच्या रूमच्या दिशेने घेऊन निघाल्या होत्या...

ती माऊली मागे मागे जाऊन त्याला हाक देत होती.."कुमार... कुमार..."

त्याचे वडील, प्रशांत, सुजित,अनिरुध्द, आर्यन, आकाश, ऋतुराज हा देखावा तसाच उभं राहून पाहण्याशिवाय काहीही करू शकले नव्हते... त्याला रूम मध्ये पोहोचवून नर्स परतून आल्या होत्या आणि काही वेळातच डॉ. वैद्य तिथे आले होते... आणि जवळ जवळ सर्वांनी त्यांना

घेरले होते... ती माऊली”माझा कुमार कसा आहे? त्याने अजून डोळे उघडले नाही, मला हाक दिली नाही...”विचारत होती.

“यांना जरा सावरा...”इशारा करत डॉ. वैद्य म्हणाले होते...

“काकू, स्वतःला सांभाळा..”कुमारचे मित्र तिला सावरत होते.

“कुमार आता कसा आहे?”त्याचे वडील विचारत होते...

डॉ. वैद्य ऑपरेशन करते वेळी घातलेला हिरवा पेहराव अंगावरून काढीत एक दुसरी नजर वर करून त्यांना पाहिले... तो हिरवा पेहराव बाजूला उभ्या एका नर्सला त्यांनी दिला... त्यावर लागलेले लाल ठिपके इतरांना दिसले नाहीत पण त्याच्या आई वडिलांच्या नजरेतून सुटले नाही... सर्वजण डॉ. वैद्य काय म्हणतात याची वाट पाहत होते...

काहीसा नाकावर आलेला चष्मा हळूच मागे सारत -”अभिनंदन! ऑपरेशन व्यवस्थित पार पडलं, कुमारला काही वेळ विश्रांतीची आवश्यकता आहे आणि चार पाच तास झाले की त्याला जाग येईल...”

असं बोलणं ऐकून सर्वांना खूप आनंद झाला होता... त्याचे आई वडील डोळ्यात नकळत आलेले पाणी तसेच ओघळत जाऊ देत ---”धन्यवाद डॉक्टर साहेब, आपले उपकार कसे फेडावे... आज तुमच्या हातून कुमारचा दुसरा जन्म झाला...”

आणि मन भरून आल्याने मनात बरंचसं बोलायचं असून त्यांना बोलायला जमलं नव्हतं, त्यांच्याशी बोलून आभार मानावे असं वाटलं तरी त्यांना शब्द गोठल्यागत जाणवले... अन भरल्या डोळ्यांनी मनोमन आभार मानून कधीचेच जोडलेले हात अजून तसेच होते... डॉ.

वैद्य यांनी समोर येऊन त्यांचे हात हातात घेतले- "लवकरच कुमार आधीसारखा पूर्णपणे बरा होईल... त्याला जाग आली की मी एकदा त्याला तपासून घेतो आणि मग तुम्ही त्याला भेटू शकता..."

सर्वांनी मनापासून डॉक्टरांचे आभार मानले... प्रशांत, आकाश, सुजित, आर्यन, अनिरुध्द, ऋतुराज एकमेकांना हसऱ्या चेहऱ्याने पाहिले... आता लवकरच कुमार ठीक होईल आणि त्याच्याशी आज काही वेळातच बोलणं होईल असे विचार मनात एखाद्या फुलाच्या कळीने उमलायला सुरुवात करावी तसे मंद गतीने यायला लागले...

हातात हात घेऊन सुजितचे वडील म्हणाले "धन्यवाद डॉक्टर वैद्य..."

"बस बस, ठीक आहे आणि रुग्णाला वाचवणं हेच माझं कर्तव्य आहे.. त्यात आभार कसले? आता मुळीच काळजी करू नका.."इतके बोलून डॉक्टर केबिनकडे निघेऊन गेले होते.

खरं तर प्रत्येकाच्याच खांद्यावर कोणती ना कोणती जबाबदारी आहे... काही न काही कर्तव्य आहे पण जीवनात अश्यावेळी कुणाच्या प्रामाणिकपणे जबाबदारी, कर्तव्य पार पाडल्याने जो आनंद आपण उपभोगतो त्याची परतफेड म्हणून नाही तर आपणांस झालेल्या आनंदाची भावना व्यक्त करताना आपण समोरच्या व्यक्तीला आभार, धन्यवाद असं बोलतो... पण सर्व भावना शब्दांत पूर्णपणे व्यक्त होतात का? अन व्यक्त केलेल्या भावना जशाच्या तश्या त्या व्यक्तीला कळतात कि नाही? कुणास ठाऊक...?

कदाचित सर्व भावना शब्दांत पूर्णपणे व्यक्त होत नाही कारण जर असे झाले असते तर मनात असलेले भाव शब्दांत सांगितल्यावर कुणालाच नकार, निराशा, विरह, तिने किंवा त्याने मला समजून घेतलं नाही याचं दुःख, त्याच दुःखाच्या सोबत एकटेपण मिळालं नसतं...

यातूनच एक हाही प्रश्न समोर येतो

“महत्वाचं काय? शब्द कि भावना...”

या लहान सहान गोष्टी कधी कधी विचार करायला लावतात,असो...

आता कुठे कुमारच्या आई वडील, भाऊ, मित्र यांना जीव जीवात आला असं वाटू लागले... डॉक्टरांचे ते शब्द त्यांना कितीतरी सुखदायक वाटले... शब्दांत सांगता येणार नाही इतकं समाधान त्यांचा चेहऱ्यावर आले... त्याचे आई वडील,सुजितचे वडील आता बरेच सावरले...

ती माऊली कधी एकदा कुमारला जाग येते आणि त्याला जवळ घेऊन ' कसा आहेस? ' असं विचारते असं तिला वाटू लागलं...

तर एक बापाचं मन जे इतरांना खचल्याचं न दाखवून धीराने वादळाचा सामना करून समुद्रात नौका घेऊन गेलेला मुलगा परतून येतो तसं काहीसं अनुभवत होतं...

तेथून काही अंतरावर -

“ऑपरेशन व्यवस्थित पार पडलं... बस आता कुमार लवकरच आपल्या सोबत पूर्वी सारखा असेल...”अनिरुध्द

“हो, डॉक्टरांच्या यशाने आपल्याला पुन्हा एकदा कुमार परत मिळाला..”आर्यन

“नक्कीच, अन सोबतच त्याची इच्छाशक्ती जबरदस्त आहे, नाहीतर...”सुजित

त्याला पुढे बोलवत नव्हतं...

“दोस्तहो, खरं आहे... आपला कुमार खूप हिम्मतवान आहे, आता कधी त्याला जाग येते असं होऊन गेलं...”ऋतुराज

त्यांचा असा संवाद ऐकून प्रशांतच्या डोळ्यात आसवं आले, त्याच्या मनात विचार आल्यावाचून राहिला नाही... खरंच दादा खूप नशीबवान आहे की त्याला असे जीव लावणारे दोस्त लाभले...

“अरे, प्रशांत असा रडतोस काय? डॉक्टरांनी सांगितलं ना कुमार दादा लवकरच ठीक होईल...”आकाश

“हो, पण मी रडत नाही तर यांचं मित्रप्रेम पाहून न राहवून पापण्या ओल्या झाल्या...”प्रशांत

“हो, हे बाकी मानावं लागेल...”आकाश

सर्व आता कुमार कधी एकदा जागा होईल आणि त्याच्याशी बोलता येईल याचीच वाट पाहू लागले... तर काही वेळापूर्वी सर्व, कुमारची डायरी नेमकी आहे तरी कुठे? म्हणून त्रासून गेले होते पण हा क्षण जो काही नव्याने आनंद लपेटून आजची दुपार घेऊन आला आणि त्यांना

त्या डायरीचा विसर पडला... बराच वेळ गोष्टी करतांना निघून गेला  मग भूकेची जाणीव झाल्याने -

“सुजित, चल आपण जरा बाहेरून फिरून येऊ आणि काहीतरी खायला पण आणू...”आर्यन

हाताच्या घड्याळाकडे पाहून”अरे हो, २ तर केव्हाच वाजून गेले...”अनिरुध्द

चावी बोटाने फिरवून”ठीक आहे... चला तर जाऊया”ऋतुराज

“यांनी डबे सोबत आणले पण अजून तसेच आहेत... येतेवेळी त्यांच्यासाठी बाहेरून काहीतरी आणू म्हणजे तेही थोडंफार जेवण करतील...”सुजित

“चला तर मग लवकर जाऊ आणि लवकर परत येऊ...”ऋतुराज

चारही जण सोबतच बाहेर पडले, थोडं पुढे गेल्यावर त्यांना बाहेरच्या तापत्या उन्हाची जाणीव झाली... दवाखान्याच्या पलीकडे काही हॉटेल आणि कँटीन होते, इतक्या भर उन्हातही रस्त्यावर वाहनांची गर्दी होती... रस्त्याच्या कडेला उभे राहून ते रस्ता ओलांडता येईल या क्षणाची वाट पाहू लागले पण तो क्षण तर नाही ती वेळसुध्दा आली नाही... रस्ता ओलांडण्याची हि काही त्यांची पहिली वेळ नव्हती आणि यापूर्वी कधीच असं बाजूला उभं राहून रस्ता काही प्रमाणात मोकळा मिळेल याची वाट त्यांनी पाहिली नव्हती पण कुमारला अपघात झाला... त्याला या परिस्थितीचा सामना करतांना पाहून आज भर्रकन या कडेहून त्या कडेला जायचा धीर होत नव्हता आणि याची काळजी घ्यावी लागते इतकं समजलं होत... 10 - 15

मिनिटांनी त्यांना रस्ता काहीवेळ मोकळा दिसला आणि ते पलीकडे पोहोचले... हॉटेल मध्ये जाऊन बसले...

“दादा, जरा पाणी मिळेल का?”अनिरुध्द

इतक्यात एक 12 - 13 वर्ष्याचा मुलगा लगेच पाण्याचे भरलेले ग्लास घेऊन हजर झाला आणि त्याने पटापट ते ग्लास टेबलवर ठेवले... खांद्यावरच्या कापडाने टेबलवर किंचित सांडलेले पाणी पुसले... डोळ्यावर आलेले केसांचे वळण हाताने मागे सारून”बोला, दादा काय ऑर्डर आहे...”

जरावेळ त्याच्याकडे पाहून -

“दोस्ता, दोन फुल चहा..”आर्यन

“आणखी काही...”

( जरावेळ एकमेकांकडे पाहून ) शेवटी सुजीतच म्हणाला -
“अजून... दोस्ता, दोन बिस्कीटचे पाकीट आणशील..”

"अनिरुध्द, अजून काही घ्यायचं का?”ऋतुराज

“नाही बस, बाकी काही नको..”अनिरुध्द

तो मुलगा दिलेली ऑर्डर आणायला निघून गेला, त्यांनी पाणी घेतले... जवळपास चारही ग्लास खाली झाले होते... बराच दिवसांनी असे एकत्र बसून चहा घेण्याचा योग आला होता तर याक्षणी कुमार सोबत नाही याची खंत प्रत्येकाला होतीच... राहून राहून त्याची कमी आणखी तीव्रतेने जाणवू लागली म्हणून एक दुसरी नजर एकमेकांना पाहून ते आजूबाजूला बघत होते...

तो मुलगा चहा, बिस्कीटचे पाकीट घेऊन आला.. दोन रिकामे काचेचे ग्लास त्या ग्लासमध्ये दोन भरलेले ग्लास त्याने टेबलवर ठेवले, बाजूला दोन पाकीट ठेवून तो दुसरा ऑर्डर घ्यायला गेला...

“आर्यन, याचे दोन कट कर बरं..”अनिरुध्द ( एकात एक ठेवलेले ते दोन ग्लास त्याच्या समोर सरकवत बोलला )

सुजितने दोन कट चहा दोन ग्लासमध्ये टाकला आणि एक ऋतुराजला देत”हं ऋतुराज चहा घे...”

त्यांनी चहा, बिस्कीट संपवले.

“मला वाटतं, घरून आणलेले जेवण बहुतेक खराब झाले असेल...”सुजित

“हो, या कडक उन्हामुळे टिफिनबंद जेवण खराब व्हायची शक्यता आहे...”ऋतुराज

“येथे आलो आहोत तर काही नाश्ता सोबत घेऊन जाऊ...”आर्यन

“दादा, पाच सहा लोकांकरिता गरमागरम नाश्ता पार्सल द्या...”अनिरुध्द

मग नाश्ता घेऊन ते दवाखान्यात परतले. कितीतरी वेळ असाच त्यांच्या विनवण्या करण्यात निघून गेला... कुमारला एकदा जाग आली की सोबतच जेवण करू... असं त्यांचं म्हणणं होतं... शेवटी सर्वांनी मिळून त्यांना स्वतःच एक दोन घास कसेतरी भरविले... मग सुजितचे वडील, प्रशांत आणि आकाश यांनीसुध्दा थोडं थोडं जेवण केलं... सर्व आधी ज्या ठिकाणी बसलेले होते तिथे पुन्हा जाऊन बसले...

“कुमार जागा झाला”इतकं ऐकण्यासाठी ते सर्व आतुरले...

पण म्हणतात ना वेळ आल्याशिवाय ती घटना, प्रसंग, परिस्थिती, वातावरण घडत नाही अथवा बदलत नाही... कालचक्र त्याच्या नियमानुसारच फिरतं आणि योग्य वेळ आली की जे व्हायचं ते घडून येतं... आपण काय अपेक्षा केली याचा कालचक्राशी काहीही संबंध नसतो तर आपलं अपेक्षित किंवा अनपेक्षित असं काहीसं जीवन नावाच्या पुस्तकावर प्रत्येक क्षण आला तसा निघून जात नवनवीन अनुभव मनावर छापले जातात, काही आयुष्यभरासाठी तर काही फक्त आणि फक्त त्या एका क्षणापुरते...

त्याचे आई वडील, सुजितचे वडील, त्याचा भाऊ आणि मित्र सारे यावेळी आपापल्या मनात काहीतरी अपेक्षित असं धरून होते, एक मात्र सर्वांच्या मनात सारखं होतं ते म्हणजे काही वेळातच कुमारला जाग येईल आणि तो लवकरच बरा होईल... अगदी पूर्ववत...

इतक्यात त्यांच्या समोरून एक नर्स हाताला लावलेल्या घड्याळाकडे पाहत कुमारच्या रूमकडे जायला लागली.. डाव्या हातावरच्या त्या घड्याळात तिने वेळ पाहिला, झटक्याने तो हात मागे घेत तिने रूमचा दरवाजा उघडला... कुमार जवळ उभी राहून तिने परत एकदा किती

वाजले ते पाहिले... एक नजर कुमारला आणि दुसरी घड्याळात फिरणाऱ्या काट्यांना ती पाहत असता-

कुमार बंद पापण्याच्या आत डोळयांची हालचाल करत असल्याचं तिला दिसून आले... काही क्षणात हातपाय मंद गतीने हलवित त्याला जाग येत असल्याचे लक्षण तिला जाणवले... तरी तो पूर्णपणे जागा व्हायची ती वाट बघत होती... ती रूमच्या आत येताच त्याने हालचाल करायला सुरुवात केली, खरं तर ऑपरेशन झाल्यावर रुग्णाला शुध्दीवर यायला कितीवेळ लागतो याचा चांगलाच अनुभव तिला आलेला होता म्हणून ती अचूक वेळेवर रूममध्ये आली...

त्याने हात जरा हलवून त्याची मान किंचित वळवली... मग हळूहळू पापण्यांची उघडझाप करत त्याने डोळे उघडले... त्याने इकडे तिकडे नजर फिरवून मग त्या नर्सकडे त्याची नजर रोखली... अगदी केविलवाण्या नजरेने तो तिला पाहत राहिला... तिने त्याचा हात हातात घेऊन एक नजर घड्याळ पाहत त्याची रक्तवाहिका तपासली...

“कसं वाटतंय?”

त्याने तिला प्रतिसाद द्यायचा प्रयत्न केला पण त्याच्या तोंडून एकही शब्द बाहेर आला नाही...

“तुला त्रास होत असेल..”

मग त्याने मानेनेच होकारार्थी खूण केली..

“तू सध्या आराम कर मी आलेच..”

पुन्हा त्याने हळूच मान हलवली...

नर्स बाहेर येताच ती माउली तिला विचारायला लागली..."कुमार जागा झाला की नाही? तो आता कसा आहे ? ठीक आहे ना?"

“आत्ताच त्याला जाग आली, तुम्ही इथेच थांबा... मी डॉक्टरांना बोलावून आणते...”इतके बोलून ती निघून गेली..

कुमार शुध्दीवर आला कळताच त्यांना कितीतरी पटीने जास्त आनंद झाला...

डॉ. वैद्य लगेच त्याची तपासणी करायला आत गेले... पाठोपाठ नर्स सोबतच रुममध्ये आली...

“हॅलो कुमार, कसा आहेस?”

त्याला बोलायला त्रास होत असल्याने हात जरा उचलून त्याने प्रतिसाद दिला...

“ठीक आहे, त्रास करून घेऊ नको...”

त्यावर पापणी जरा मिटून त्याने होकार दिला...

डोक्याचे बारकाईने निरीक्षण करून डॉक्टर -”कुमार, डोकं जपून.. जास्त हालचाल करायची नाही...”

त्याने हाताने इशारा केला...

“आणखी कुठे दुखतं का?”

त्यावर त्याने काहीही प्रतिक्रिया दिली नाही..

“ठीक आहे, मी आता परत जातो  नंतर भेटूया... काळजी करू नकोस सर्व ठीक होईल...”

परत येतांनी दार लावून दोघे बाहेर आले...

यावेळी त्याचे आई वडील काही विचारण्यापूर्वीच डॉ. वैद्य स्वतःहून म्हणाले...

“कुमार शुध्दीवर आला आहे आणि बरा आहे... डोक्याला ताण पडत असल्याने त्याला आत्ता बोलता येत नाही, हळूहळू त्रास कमी व्हायला लागला की तो आधीसारखा आपल्याशी गप्पा गोष्टी सांगेल...”

काहीसं निराश होऊन ते डॉक्टरला पाहत होते... ती माऊली डोळयात पुन्हा एकदा जमा झालेले अश्रू पापणीतून खाली उतरताच पदराने पुसत दुसऱ्याक्षणी

“डॉक्टर मी त्याला भेटू शकते?”

सर्वांनाच त्याला भेटायचं होतं पण मनातलं तसंच मनात ठेवून ते बाजूला उभे राहिले...

"हो तुम्ही जा , त्याला भेटून या  आणि त्याला त्रास होईल म्हणून त्याच्याशी गप्पा मारत बसू नका आणि शक्यतो त्याच्यासमोर कृपया रडू नका..."

डॉक्टर परत आपल्या केबिनकडे जात असताना प्रशांत, सुजित,आर्यन, अनिरुध्द,ऋतुराज,आकाश सर्वांनी घोळका घालून आम्हाला पण कुमारला पाहायचं आहे म्हणत जागीच थांबवलं...

जरावेळ विचार करून -

"एक काम करा, तुम्ही सर्व काही ठराविक वेळेनंतर त्याला भेटायला जा, एकाचवेळी सगळे आत जाऊ नका आणि मी जे सांगितलं ते लक्षात असू द्या, त्याच्याशी जास्त बोलू नका.. ठीक आहे..."

डॉक्टर तिथून जात्तांना नर्सला तसं सांगून गेले... नर्स तिथेच बाजूला खुर्चीवर बसून आधी त्याच्या आई वडिलांना आणि सुजीतच्या वडिलांना आत जा म्हणाली, लवकर परत या असं हि बोलली...

तिला होकार देऊन ते तिघे त्याला पाहायला आत गेले...

## २५. सोनेरी क्षण

रूमचा दरवाजा उघडून ते शिरले... समोर बेडवर कुमार, त्यांना आत येतांनी बघून त्याने जरा मान वळून पाहिलं... त्याला त्रास होऊ लागला तशी त्याने मान परत सरळ केली... नजर रोखून तो त्यांना पाहू लागला, त्याची आई जवळ आली, त्याला त्या अवस्थेत पाहून तिला काय वाटतं होतं याची कल्पना कुणालाच करता येणं जवळ जवळ अशक्य.. !

तिने खूप धीराने पापणीवरचे आसवं खाली गळण्याआधी पटकन पदराने टिपले... त्याच्या बेडजवळच दोन लहान लहान स्टूल ठेवलेले होते, ती मात्र त्याच्याजवळ बेडवर बसली... त्याच्या हाताला स्पर्श करून त्याच्या पूर्णतः उतरलेला चेहरा पाहून -

“कुमार... कुमार...”

त्याचं नाव ओठावर आलं आणि तिचा धीर खचला, डोळयांत आसवांनी गर्दी केली, पापण्यांच्या बांध मोडून अश्रुधारा वाहू लागली... तिच्या खांद्यावर हात ठेवून त्याच्या वडिलांनी डॉक्टर काय म्हणाले होते आठवून देत -

“अगं, बघ कुमार बघतो आहे... तो आता बरा आहे... लवकरच होईल”
त्यांनासुद्धा भरून आलं...

मग सुजीतच्या वडिलांनी त्यांना स्टुलावर बसायला सांगितले...”तुम्ही जरा स्वतःला सांभाळा, आपण त्याला पाहायला आलो आणि तुम्ही...”त्यांनी आपलं बोलणं आवरत घेतलं..

त्या मायमाऊलीने आसवं पुसले, काही क्षण त्याला एकटक पाहिलं... मायेनं त्याच्या चेहऱ्यावरून हात फिरवत -

“कसं वाटतं रे बाळ आता? खूप त्रास होत आहे का?”तो काहीतरी बोलेल या अपेक्षेने ती त्याच्याकडे पाहत राहिली...

पण तो एक शब्दही बोलू शकत नव्हता... नुसतंच नजरेनं आळीपाळीने तो त्यांना पाहत होता, तिचे पाण्याने डबडबलेले डोळे पाहून त्याच्या पापण्या ओल्या झाल्या... कदाचित तिचं आपुलकीनं बोलणं ऐकून, तिचा स्पर्श अनुभवून... जखमेच्या वेदनेने...

त्याच्या डोळयात पाणी आलेले पाहून, ती उठून उभी झाली... खाली वाकून तिने लगेच पदराने त्याचे आसवं पुसले... मस्तकावर हलकेच ओठ टेकवून तिने दोन्ही हातात चेहरा धरला...”बाळा तू लवकर बरा होशील, काळजी करू नको आम्ही सगळे आहोत ना...”

ती परत त्याच्या बाजूला बसली... त्याच्या डोळयात पाणी पाहून तिचं मन पेटून उठलं, ती धीट झाली अन त्याच्या हातावर हात ठेवून नजरेनं त्याला हिंमत ठेव म्हणून जसं सांगू लागली...

“कुमार, बोल रे काहीतरी...”इतकंच काय ते त्याचे वडील बोलले

“बेटा, लवकर बरा हो...”सुजितचे वडील

पण तो काहीएक बोलला नाही,काही वेळ तेही शांत बसून त्याला पाहत राहिले... नर्सने दरवाजा उघडला, त्यांना बाहेर या असा इशारा केला... तरी थोडावेळ थांबून ते बाहेर पडले...

रूमच्या बाहेर आल्यावर बाकी सर्व त्यांच्याजवळ आले...

"आई बाबा, दादा काय म्हणाला? तो बरा आहे ना?"प्रशांत

"हो बाळा..."

"बाबा, कुमार कसा आहे?"सुजित

"जागा झाला आहे पण काहीच बोलला नाही.."

"काहीच नाही...?"आर्यन, अनिरुध्द, ऋतुराज

"नाही..."त्याची आई

"आता आपण जाऊ पाहायला..."आकाश

"जरावेळ थांबा, नंतर जा... आता त्याला आराम करू द्यायला हवा.."बाजूलाच उभ्या असलेल्या नर्स ने संवादात सहभागी होऊन सांगितले..

"ठीक आहे, यावेळी मी, प्रशांत आणि आकाश आत जाणार... मग काहीवेळाने आर्यन, अनिरुध्द, ऋतुराज.."सुजित म्हणाला

“हो ठीक आहे आता मात्र तुम्ही हॉलमध्ये बसा... तिथे टी व्ही लावलेला असतो...”नर्स

तिचं बोलणं झालं तोच त्याचे आई वडील आणि कुमारचे वडील समोरच बसायला खुर्च्या होत्या तिथं जाऊन बसले... बाकी सर्व काही अंतर समोर चालत गेले, पहिल्या मजल्यावर असल्याने ते सर्व गॅलरीत येऊन थांबले म्हणजे रुमपासून अगदी हाकेच्या अंतरावर...

आकाश आणि प्रशांत पाणी आणायला निघून गेले... दोन बॉटल त्यांनी येतेवेळी सोबत आणल्या त्यापैकी एक सुजीतकडे देऊन एक सोबत घेऊन आई बाबा जवळ आला... उन्हाळ्याचे दिवस, दिवसभर बाहेर चांगलंच तापलं होत, दवाखाना वातानुकूलित असल्याने त्यांना बाहेरची तितकीशी जाणीव नव्हती... जे काय नियतीनं त्यांच्या समोर आज मांडलं होत त्यामुळे त्यांना बाहेरच्या जगाचा विसर पडला होता...

सवयीला आहारी जाऊन एकापाठोपाठ सर्वांनी मोबाईल बाहेर काढले, जवळपास 5:30 वाजलेले...

तसा सुजितने प्रशांतला कॉल करून जवळ बोलवलं आणि आता आपण आत जाऊ असं इशाऱ्याने सांगितलं...

मग ते तिघे नर्सजवळ जाताच, एव्हाना तिलासुध्दा ह्यांना आत जायचं आहे हे कळलं होतं...”जा पण लवकर परत या आणि त्याला त्रास होईल असं काहीही बोलू नका, करू नका...”

ते आत आले, कुमार डोळे मिटून होता...

“दादा बहुतेक झोपला वाटते...”प्रशांत

“हो रे... मला तसंच वाटतं”आकाश

रूममध्ये शांतता पसरली होती म्हणून त्यांचा हळू आवाज त्याला ऐकू आला... त्याने डोळे उघडले, सुजित त्यालाच पाहत होता म्हणून त्याला लगेच लक्षात आलं...”जरा शांत व्हा, तो बघा कुमार जागाच आहे...”तो म्हणाला.

तिघेही त्याच्याजवळ जाऊन बसले... प्रशांत बेडवर तर सुजित आणि आकाश स्टुलावर.. ! तो त्यांना एक एक वेळा नजर फिरवून पाहू लागला, जरा मान वर करून त्याने उठायचा प्रयत्न केला...

“कुमार, तसाच पडून रहा... तुला त्रास होईल...”सुजित

“दादा, कसा आहेस तू? बरं वाटतं का?”प्रशांत

त्याने नजर रोखून त्याला पाहिलं, पण बोलता येत नसल्याने त्याने फक्त हात जरा हलवून त्याला प्रतिसाद दिला...

“दादा, तू लवकर बरा होशील...”आकाश

एव्हाना तिघ्यांनाही कळून चुकलं कि कुमार काहीही बोलणार नाही पण तरी त्याला काहीवेळ सहवास मिळावा म्हणून ते थांबले... नीरव शांतता... आणि फक्त शांतता...

इतक्यात नर्सने त्यांना हळूच दार उघडून बाहेर या! म्हणून खुणावले... ते तिघेही बाहेर निघाले, प्रशांत आईजवळ जाऊन बसला, आकाश त्याच्याजवळ थांबला... सुजित गॅलरीत आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज होते तिथे आला...

“सुजित, कुमार कसा आहे ?”सर्वांनी सोबतच विचारले...

“शुध्दीवर आला खरा पण काहीही बोलला नाही..”सुजित

“कुमार शुध्दीवर आला हे खूप छान झालं...”अनिरुध्द

“हो... पण तो काहीच का बोलतं नाही...?”सुजित

“मलासुध्दा हाच प्रश्न  पडला.. त्याने काही तरी बोलायला पाहिजे...”आर्यन

“मला वाटतं तो बोलायचा प्रयत्न करत असेल पण त्याला त्रास होत असेल म्हणून...”ऋतुराज

सर्वांनी नजरेनं त्याला सहमत असल्याचं सांगितलं... बोलता बोलता काही वेळ निघून गेला. बराच वेळ ते एकाच ठिकाणी उभे होते, मग खालच्या मजल्यावर जाऊन ते सर्व चहा प्यायले आणि बाकी पाच जणांकरिता चहाची ऑर्डर दिली आणि वर आले... त्यांच्या पाठोपाठ चहा घेऊन कँटीन वाला तिथं पोहोचला, सर्वांचा चहा पिऊन झाला...

आता कुमारला पाहायला आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज आत गेले, त्यापूर्वी नर्सने कुमारला सलाईन लावले होते... ते तिघे आले, कितीतरी दिवसांनी ते कुमारला पाहत होते चेहरा

काहीसा निस्तेज झालेला पाहून त्यांना नेहमी हसणारा आणि इतरांना हसविणारा कुमारचा शेवटी कधीतरी पाहिलेला चेहरा आठवला... त्यांनीसुध्दा कुमारला बोलतं करायचा प्रयत्न केला पण काहीही उपयोग न झाल्याने त्यांनाही इतरांसारखं फक्त त्याला डोळे भरून पाहता आलं..."लवकर बरा हो, हिम्मत ठेव, आम्ही आहोत! तुझ्याशी खूप काही बोलायचं आहे"असं बोलून त्यावर कुमार काहीतरी बोलेन या अपेक्षेने बोलले पण त्यांनाही अपयश आले... तेसुध्दा पडलेला चेहरा घेऊन बाहेर आले... आता वास्तविक परिस्थिती सर्वांना माहीत झाली होती म्हणून तेच तेच प्रश्न विचारायचे त्यांनी टाळलं...

सायंकाळचे 7 वाजत आले, बाहेर सगळे लोक आपल्या दैनंदिन जीवनात आनंद, द्वेष, सुख दुःख, साथ, एकांत जे काय वाट्याला आहे ते मान्य करणाऱ्या तर काही त्याच गोष्टींचा विरोध करून असं का? असा प्रश्न निर्मिकाला विचारणाऱ्या सर्वांचा आजच्या पुरता निरोप घेऊन सूर्य पश्चिमेला जाऊन पोहोचला...

इतक्यात आकाशचे वडील आणि काही शेजारी भेटीला आले... पुन्हा एकदा कुमार कसा आहे? हा प्रश्न नव्याने त्यांना ऐकावा लागला आणि तेच ते एक उत्तर देताना त्यांचं मन जड होत होतं... सर्व दिलासा देऊन परतून जायला लागले...

मोबाईल मध्ये वेळ पाहत"आपल्याला ही निघायला हवं, आपण सर्वांना रात्री इथं थांबणं जमणार नाही.."ऋतुराज

"हो, बरोबर आहे..."आर्यन

"आज आपण सर्व कुमारच्याच घरी जाऊ..."अनिरुध्द

सर्वांनी होकार दिला  तर कुमारचे वडील, सुजितचे वडील आणि आकाशचे वडील हे तिघेही तिथेच थांबले... बाकीचे सर्व घरी परत जायला निघाले... काही वेळातच ते सर्व त्याच्या घरी पोहोचले... ती माउली घरी आल्या आल्या आवराआवर करायला लागली तोपर्यंत सर्वजण हातपाय तोंड धुऊन थकवा दूर करून ताजेतवाने झाले... मग सर्वांनी चहा घेतला अन बाहेरच अंगणात बैठक मांडली... गप्पा गोष्टी सुरु असता मध्येच कुमार सोबत असतांना घालवलेले क्षण प्रत्येकजण पुन्हा आज नव्याने जगत, एकमेकांना सांगू लागले...

तिला गहिवरून आलं आणि ती डोळ्यातलं पाणी पुसून, आत गेली... तसे सर्व शांत झाले... आईच मन नकळत दुखवलं गेल्याची त्यांना जाणीव झाली... प्रशांत पाठोपाठ आत जाऊन तिला धीर देत -"आई, तू रडू नकोस नाहीतर मला पण रडायला येईल..."त्याच्या एका वाक्याने ती सावरली...

"नाही, बाळ आता रडणार नाही , बरं सांग काय  जेवायला बनवू..?"

इतक्यात आर्यन आणि अनिरुध्द घरात आले...

"तुम्ही काहीपण बनवलं तर आवडेल... साधंच जेवण..."अनिरुध्द

"काकू मी तुम्हाला मदत करतो..."म्हणत आर्यन तिच्याआधीच स्वयंपाकघराकडे गेला...

तिला मदत करायला लागला... त्याला स्वयंपाकच नाही तर इतर कामातही मदत करायची आवड..

अनिरुध्द बाजूच्या खोलीत जाऊन मोबाईल चार्जर कुठे मिळते का शोधू लागला... आत गेल्यावर समोरच्या भिंतीवर बोर्डला लावलेला चार्जर त्याला दिसला, मोबाईल चार्जिंगला लावून त्याने भिंतीच्या कप्प्यात ठेवला... त्याने आजूबाजूला नजर फिरवली आणि कितीतरी वेळ इथेच कुमारशी आपण गप्पा मारत होतो त्याला आठवलं... जसजसा तो खोलीत वावरायला लागला तसतसा आठवणींचा थवा त्याचा मनात गर्दी करायला लागला आणि गतकाळात जे काय झाले ते नजरेसमोर काही पुसट, धूसर त्याला जाणवलं, नकळत ते क्षण आठवत तो कुमारची आवडती पुस्तक हाताने स्पर्श करून जणू कुमार आसपास असल्याचं अनुभवू लागला... बरेचसे नावाजलेले पुस्तक वाचून उभे ठेवलेले, व्यवस्थित रचलेले होते... त्या सर्वांत सहज ओळखू येईल असे एक लहान पुस्तक पुस्तकांवर आडवे ठेवलेलं त्याला दिसलं... शेवटी मानवी स्वभाव जरा काही भिन्न दिसलं कि मन तिकडे धाव घेतं म्हणूनच मनाला आहारी जाऊन त्याने ते पुस्तक हाती घेतलं...

पुस्तकाच्या मुखपृष्ठावर मोठ्या अक्षरात नाव छापलेले होते...

“दुनिया तुला विसरेल...”

माननीय वा. वा. पाटणकर यांच्या शायरीचे वपु काळे यांनी केलेले रसग्रहण...

त्याने सहज हाती घेऊन पुस्तक उघडलं... काही पानांच्या मध्ये जास्तच अंतर असून तिथे काहीतरी असल्याचं त्याला दिसून आलं... पुन्हा स्वभावाला औषध नाही हेच खरं अन त्याने पुस्तक वाचायचं सोडून आधी पटापट पान बाजूला सारून त्या पानांच्या मध्ये काय ठेवलं आहे असं स्वतःलाच विचारलं... तो असा बिलकुल वागला नसता पण कुमारच्या डायरीबद्दल जेव्हा त्याने सुजितकडून ऐकलं होतं त्यामुळे इथं काहीतरी शंका आल्याने त्याने पान न वाचता बाजूला सारले...

आणि बघतो तर काय? एक कागद मधातून घडी मारलेला त्याला दिसला, क्षणाचा विलंब न करता त्याने तो कागद उचलला आणि समोर धरून वाचू लागला...

*आज मी माझं सारं आठवणींचं ओझं माझ्या डायरीत बंदिस्त करून ठेवलं... मन काहीसं हलकं जाणवत आहे... जीवनात जे काय घडून गेलं ते पुन्हा लिहितांना अगदी तेव्हा जितकं अनुभवलं नाही त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक मला जाणवलं... आनंद, विरह, सुख, दुःख सारं सारं अगदी पुन्हा नव्याने घडत आहे असं वाटून गेलं... सारे क्षण पुन्हा जगायला मिळाले जणू काही ते फक्त आणि फक्त माझ्यासाठी भूतकाळाशी रजा घेऊन परतून आले..."सोनेरी क्षण"आता तर कधीच विसरू शकणार नाही असे वाटते... !*

*अन दुसऱ्याच क्षणी मनात विचार आला मी किती स्वार्थी आहे? मी केवळ माझाच विचार केला माझ्या जिवलग दोस्तांच काय? त्यांनी हे अनुभवायला नको... त्यांच्या जीवनात हि काही क्षण जे सोनेरी म्हणजे कधीच परतून येणार नाही असे, येऊन गेले पण आता ते सारे भूतकाळात विलीन झाले... पण माझ्या डायरीसारखेच मी त्यांच्या जीवनांत आलेले ते क्षण लिहून ठेवले तर त्यांना पुन्हा एकदा तरी तसं जगता येईल, अथवा काहीसं अनुभवता येईल...*

*मग मी निश्चय केला आजपासूनच कामाला सुरुवात करायची आणि ते सोनेरी क्षण पानांवर उतरवायचे... इतक्यात जेव्हा त्यांच्याशी भेट होईल तेव्हा लिहिलेलं एक आठवणींची शिदोरी म्हणून माझ्याकडून माझ्या दोस्तांना एक भेट असेल...*

खाली त्या दिवसाची तारीख आणि त्याच नाव लिहिलेलं होतं...

हे असं वाचून आणखी एक आश्चर्याचा धक्काच त्याला बसला... अचानक डोकं जड झालं असं वाटलं, रेल्वे रुळावरून एका मागे एक अश्या अनेक रेल्वे सुसाट वेगाने धावत आहे तसे कित्येक प्रश्न मनात ये जा करू लागले... अगदी सुन्न झाल्यासारखं त्याला जाणवलं जसा तळहात बर्फावर तसाच तासन तास ठेवावा... काही वेळाने हात बाजूला केला असता काही क्षण हात आहे की नाही याची जाणीव होत नाही तसेच अनिरुध्द अनुभवत होता...

किंचित आवाज ऐकू आला, तेव्हा तो भानावर आला... तसा पहिला विचार त्याच्या मनात आला अन हळूहळू विचारांनी त्याच्याभोवती एक अदृश्य पोकळी निर्माण केली... 'कुमार तू स्वतः एक गुपित पुस्तक आहे  कितीतरी रहस्य त्यात दडवून असतील... तुझी डायरी जी अजून मला माहित नव्हती, केवळ सुजितने ती वाचली आहे तर आता हे एक आणखी नवीन... पण तू आमच्याबद्दल काही लिहिलं आहे तर ते आहे तरी कुठं...? सुजितला याबद्दल माहित असेल का..? कि आणखी कुणाला...? कि मीच आहे तो पहिला...? नशीबवान? मला सर्वप्रथम माहीत झालं म्हणून... कि कमनशिबी? फक्त तू काहीतरी लिहिलं इतकंच मला कळलं...

**तर काय लिहिलं आणि कुणा कुणाबद्दल? ठेवलं कुठं? केव्हा वाचायला मिळेल?**
**या विचारांनी, प्रश्नांनी त्याला त्रस्त केले..**

एकांतात मन आणि ते मनातले बेलगाम विचार जंगली घोड्याप्रमाणे सुसाट वेगाने येतात आणि जातात... अधीर करून सोडतात... अधीर झालेलं मन जास्त चौकस असतं... प्रत्येक गोष्टीची पारख करायचं ठरवतं, जे माहिती नाही ते माहित करून घेण्यासाठी योग्य वेळेची वाट न पाहता बसता शोध सुरु करतं...

या नश्वर देहाची तुलना बाजूला ठेवली तर शेवटी आपण सगळे लोक सारखेच... विचारांत काहीसा फरक पडतो तोही केवळ ती विशिष्ट व्यक्ती ज्या वातावरणात, ज्या कुणाच्या सहवासात वावरते त्यावर अवलंबून असते...

ते पुस्तक जिथल्या तिथं त्याने परत ठेवलं आणि काही संशयित नजरेस पडतं का म्हणून तो पाहू लागला... कप्प्यात ठेवलेले सर्व पुस्तक एक एक बाजूला करून त्याने पाहिले. जवळच भिंतीच्या खुंटीला लटकलेली एक बॅग दिसली त्याने लगेच खाली काढून ती उघडली पण त्याला निराशाच मिळाली, मग बिछान्याखाली वाकून पाहिलं तर एक जुनी पत्र्याची पेटी दिसली, त्याने ती बाहेर ओढून ताणून काढली पण त्यात काही जुने कागदपत्रे, जुनी पुस्तके, काही कपडे, काही लग्नपत्रिका सापडल्या पण जे तो शोधत होता तसं काहीच मिळत नव्हतं... न राहवून त्याने नाही नाही म्हणत भिंतीला टेकून ठेवलेले कपाट उघडले वर वर नजर फिरवली तर त्यात कपड्यांखेरीज काही दिसेल हि आशा संपली... आता तो घामाने पुरता ओलाचिंब झाला, जरा थकला - इतकं शोधून अखेर अपयशच मिळालं म्हणून पंखा सुरु करुन तो बिछान्यावर बसला... ' दोस्ता कुठं ठेवलं आहे लिहून ते गुपितं सोनेरी क्षण? तू स्वतः काही एक प्रश्नापेक्षा कमी आहे का? ' स्वतःशीच बडबडला...

कपाटावरून एक चेंडू खाली पडला, पंख्याच्या आवाजाने कपाटावर बहुदा निजलेला उंदीर घाबरून पळाला त्याच्या धावपळीमुळे तो चेंडू खाली पडला होता. त्याने तो चेंडू उचलला आणि परत वर ठेवतांना एका बॉक्सवर त्याची नजर खिळली.. वरून तो बॉक्स त्यात कधी बूट आणले असल्याचं त्याला समजलं.. पायांचे तळवे किंचित वर उचलून त्याने बॉक्स खाली काढला...

“देवा, यांत तरी काही मिळू दे...”म्हणत त्याने बॉक्स उघडला...

तर एक कोर कट पांढरं पान त्याला दिसलं... हळूच पानाला मोळ पडू न देता त्याने पान बाजूला केलं... ते पान बाजूला सारताच मोठा खजिना सापडावा इतका आनंद त्याला झाला... त्याच्या नजरे समोरच सोनेरी रंगाच्या वेष्टनावर वर जरा डाव्या बाजूला To, त्याखाली अनिरुध्द आणि खाली उजव्या बाजूला from, कुमार असं लिहिलेलं त्याने वाचलं अन आनंदाने त्याच्या डोळयांत आसवं चमकली...

## २६. जाणीव

अनिरुध्द बॉक्स जवळ बसून असतांना डोळे भरून आल्याने त्याचे दोन चार आसवं त्यावर पडली... पटकन खिश्यातून रुमाल काढून त्याने ते आसवं पुसले अन ओल्या पापण्या हि रुमालाने पुसल्या... मग अलगद बाहेर काढून त्यावर डाग तर पडला नाही ना म्हणून पाहण्यास त्याने जवळ घेतले. परत एकदा हलक्या हाताने ते वेष्टन साफ केले. निरखून पाहिल्यावर त्याला समजले की ते सोनेरी रंगाचे वेष्टन सर्व बाजूंनी चिटकवून पॅकिंग केले आहे... अन त्याला प्रश्न पडला की आता काय करायचं? आत काय ते उघडून पाहायचं कि नाही? कुमारला काय वाटेल? तो स्वतः भेट म्हणून कधीतरी देणार तर आहे... मग आता जसेच्या तसे राहू द्यायला हवे, कुमार ठीक झाला की स्वतःहून तो जेव्हा मला देईल तेव्हाच मी वाचणार..

असं स्वतःलाच समजावून तो ते परत बॉक्स मध्ये ठेवणार तोच त्याला बॉक्समध्ये आणखी तसेच काहीतरी  असल्याचं दिसून आले, फक्त To, नंतर सुजितचं नाव लिहिलं होतं त्याने कुतूहलाने ते पॅकिंग केलेलं गिफ्ट बाहेर काढलं तर त्याखाली पुन्हा एक असल्याचं दिसून आले यावेळी तिथं आर्यनचं नाव होतं... त्याने ते गिफ्ट वर काढलं तर आणखी एक पण त्यावर Rj असं लिहिलं होतं... हे सगळं पाहून खरं म्हणजे आश्चर्याच्या धक्क्यांची परिसीमा केव्हाच ओलांडून गेली होती... कुमारने काय काय गुपितं आजवर सांभाळून ठेवली त्यालाच ठाऊक! पण मला आता हे जे काही कळलं ते मी माझ्या मनात कितीवेळ ठेवू शकेल? एखादी गोष्ट माहित झाल्यानंतर जाणीवपूर्वक इतरांपासून लपवून ठेवणं काही सोप्प काम नाही...

स्वतःशीच काहीतरी असा पुटपुटत त्याने सारे गिफ्ट जसेच्या तसे बॉक्समध्ये ठेवले पण जेव्हा त्याच्या नावाचं गिफ्ट ठेवायची वेळ आली तेव्हा परत आत ठेवू कि नको असं त्याला होऊन गेलं... बराच वेळ विचार करून त्याने ते हि आत ठेवून दिलं आणि बॉक्स बंद करून कपाटावर ठेवून दिला... मग तो जरावेळ बिछान्यावर बसला पण राहून राहून त्याच लक्ष त्या

बॉक्सकडे जात होतं... एक क्षणासाठी त्याच्या मनात आलं की नसती उठाठेव केली आणि नको ते माहित करून घेतलं आता कशी झाली पंचाईत?

तो विचार करत मग्न झाला... बाहेर कुणीतरी आवाज देत आहे असं त्याला ऐकू आला अन तो भानावर आला... खोलीतून बाहेर पडला तर ऋतुराज त्याला हाक मारत होता... दोघे समोरासमोर आले...

“अनिरुध्द, तू कुठे होता? किती वेळ पासून तुला शोधत होतो?”

स्वतःला सावरत”अरे मी, मी आत खोलीत होतो...”

“बराच वेळ झाला म्हणून...”

“जरा डोळा लागला होता...”

“ठीक आहे, चल बाहेर बसू, सगळे अंगणात बसून आहेत...”

“बरं चल जाऊ..”

रात्रीचे जवळपास 8 वाजत आले, निळं निळं आभाळ, आकाशात चटक चांदणं, सोबतीला चंद्राची कोर... गार वारा सुटला. बराच दिवसानंतर असे सगळे निवांत एकत्र बसले. कसं काय सुरु आहे? या एका प्रश्नाने संवाद सुरु झाला या एकाच प्रश्नावर प्रत्येकाने त्यावर आपले उत्तर सांगितले... कुणी आपली खुशाली तर कुणी काही नाही तेच तेच रोजची चार भिंतीतली जिंदगी असे काही बोलता बोलता - मध्येच आर्यन”चला भावांनो जेवण तयार आहे...”

“आर्यन, ये बस सोबत काही वेळ...”सुजित

“हो, नंतर बसू आधी जेवण करू...”ऋतुराज

“तू काय म्हणतो अनिरुध्द?”आर्यन

तो अजूनही तिथेच सोनेरी क्षणाच्या दुनियेत हरवलेला... त्याचं इकडे मुळीच लक्ष नव्हतं तर नवं जाणून घेतलेलं अश्यावेळी नकळत बाहेर येता कामा नये म्हणून तो जरा अलिप्त राहण्याचा प्रयत्न करीत होता...

“अनिरुध्द, अरे तू ठीक तर आहे ना..?”त्याच्याजवळ जाऊन ऋतुराज म्हणाला.

विचारातून बाहेर येऊन”हं काय काय झालं...?”अनिरुध्द

“तेच तो तिला विचारत आहे, काय झालं?”सुजित

“काही नाही?”अनिरुध्द

“अन इतका कशाचा विचार करत होता?”आर्यन

“काही नाही? तू सांग काय म्हणतो?”अनिरुध्द

“मी म्हटलं जेवण तयार झालं आहे, तर जेवण करायचं का?”आर्यन

मध्येच त्याच बोलणं पूर्ण झालं की नाही तर”मी म्हटलं जेवू नंतर काही वेळाने..”ऋतुराज

“बरं बस आर्यन जरावेळ आणि काकूला पण बोलावं गार वारा सुटला...”अनिरुध्द

जरावेळ आणखी ते बाहेर बसले, काही वेळातच जेवण आटोपले आणि जेवण झाल्यावर थोडं नुसतंच चालायचं म्हणून चौकातून एक दोन चक्कर फिरून घरी आले... पुन्हा बाहेर अंगणात बैठक भरली, जेवणाआधी आर्यन तिथे हजर नव्हता म्हणून आता काहीवेळ आर्यनच्या जीवनात काय चाललंय याबद्दल चर्चा चालली... ती माउली आज कुमारला डोळे भरून पाहिल्याने स्थिरावली, मनावरचं दडपण कमी झाल्याची तिला जाणीव झाली... गप्पा मारत असतांना ते तिलाही त्यात सामील करून घेत होते,

प्रशांत दमल्याने त्याचा लवकरच डोळा लागला, ती माउली त्यांच्यासोबत बोलतांना कुमारच्या काही जुन्या आठवणी जाग्या झाल्या आणि ती भावूक होऊन त्याचे काही बालपणीचे कधी कॉलेजला असतांना तो कसा होता सांगत होती... बोलत असतांना कधी कधी नकळत तिच्या पापण्या ओल्या झाल्या तेव्हा सर्वांनी मिळून तिला सावरलं...

“काकू, बराच वेळ झाला, तुम्ही आराम करायला हवा...”आर्यन

“हो तुम्ही आराम करा..”सुजित

“आम्ही सगळे थोड्या वेळाने झोपू..”ऋतुराज

तर अनिरुध्द मुद्दाम बोलायचं टाळत होता, यासाठी तितकंच ठोस कारण होतं आणि ते म्हणजे बोलता बोलता जर त्या बॉक्सबद्दल एकजरी शब्द बाहेर पडला तर काय होईल याची त्याला जरा कल्पना होती... पण तो शांत आणि अबोल राहिल्याने आणखी तोच तो विचार त्याच्या मनात येत राहिला, मध्येच त्याला कुमारची डायरी आठवली अन अचानक आलेल्या या विचाराने तो हळूच पण स्पष्ट बोलला..."डायरीबद्दल कुणालाच कसं आजवर कळलं नाही?"

बस झालं, सर्वांना आतापर्यंत डायरी चा जणू विसर पडला होता पण अनिरुध्द ते वाक्य बोलला आणि सगळयांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला... कुमारचं ऑपरेशन सुरु झालं तेव्हा याच विषयावर चर्चा सुरू होती म्हणजे"डायरी आहे कुठं?"

कुमारचं ऑपरेशन झालं, त्याला रूममध्ये आणलं तेव्हा सगळे डायरी बद्दल बेफिकीर झाले मग जेव्हा कुमार शुध्दीवर आला तसं डायरी सर्वच विसरले होते... पण अचानक यावेळी अनिरुध्द बोलला आणि डायरीचं कुतूहल प्रत्येकाच्या मनात नव्याने पेटलं... सर्व सुजितला नजर रोखून पाहू लागले...

"सुजित, तू पण डायरी विसरला..?"आर्यन

"तू आम्हांला काल रात्री काय म्हणाला होता की आज सकाळी ती डायरी दाखवणार..."ऋतुराज

"हो ना.."अनिरुध्द जरा मोजकंच बोलून थांबला.

"आणि सकाळपासून तू डायरी कुठं आहे ते सांगितलंच नाही..."आर्यन

“बरं ते जाऊ दे, काय लिहिलं आहे ते तरी सांग...”अनिरुध्द

“अरे, माझं ऐकून तरी घ्याल कि नाही?”सुजित

“हं बोल.. कुठं आहे डायरी?”आर्यन, ऋतुराज सोबतच

“पहिलं तर डायरी सध्या माझ्याकडे नाही तर चुकून आकाशने तिच्या बॅगमध्ये टाकली... दुसरं असं की माझ्या सांगण्यापेक्षा तुम्ही डायरी परस्पर वाचली तर छान होईल...”सुजित

“ठीक आहे...”अनिरुध्द

“ठीक आहे, काय ठीक आहे? भावा डायरी कुठे आहे?”आर्यन

“सांगितलं ना तिच्या बॅगमध्ये आहे आणि ती उद्या सकाळी कुमारला भेटायला येणार तेव्हा सोबत घेऊन येणार आहे..”सुजित

“ती म्हणजे कोण?”ऋतुराज

“उद्या आल्यावर माहित होणारच...”सुजित

“अरे हे बाकी बरोबर नाही... आधीच तर कुमारने न सांगता डायरी लिहिली हे एक नवलाची गोष्ट... त्यात आणखी भर पडली डायरी वाचायला मिळत नाही..”आर्यन

“एक आणखी नवीन, ती कोण? तर भाऊ म्हणतो ते उद्या माहित पडेल... म्हणजे लवकरच आम्हाला पण ऍडमिट व्हावं लागेल बहुतेक...”ऋतुराज

“काही सांगता येत नाही... एक एक नवीनच समोर येत आहे..”अनिरुध्द शब्दांना आवर घालून मध्येच थांबला.

पण तो ज्या भावनेनं बोलला ते कुणालाच कळलं नाही आणि त्यासाठी त्याने स्वतःचेच मनोमन आभार मानले...

“बरं उद्या नक्की ना...”ऋतुराज

“हो एकदम नक्की...”सुजित

“नाहीतर पुन्हा विसरशील...”आर्यन

“अनिरुध्द, तू लक्षात ठेव बरं उद्या काहीही होवो ती डायरी वाचायची आहे...”आर्यन

“हो भावा, तू काळजी करू नको मी विसरणार नाही...”अनिरुध्द

असं बोलत असता ते सर्व तिथेच आडवे झाले, वर आकाशाकडे नजर लावून कुमार सोबत असतांना जे क्षण सर्वांनी मिळून घालविले ते आज आठवून डोळ्यांवर झोप येण्याची वाट पाहत होते... आज मन शांत होतं, कुमारला जाग आली तेव्हापासून सगळेजण काळजीतून जरा मुक्त झाले, एक नवीन आशा दिसत होती... आता लवकरच कुमार बरा होईल असं सर्वांना वाटत होतं... असा विचार करत सगळ्यांना झोप लागली पण अनिरुध्द अजून जागाच होता... जशी

आज त्याची झोप उडाली, जणू त्याच्यावर आज झोप रुसली असं त्याला जाणवलं... तो बेचैन झाला, इकडून तिकडे कूस बदलत मध्यरात्र उलटून गेली...

पण त्याला काही झोप येत नव्हती, डोळे मिटून तो तसाच पडून राहिला... तो बॉक्स त्याच्या नजरेसमोर येत होता जणूं त्याला जवळ येऊन त्या बंदिस्त रहस्याला मुक्त कर असं सांगत होता... शेवटी कुमारने जे काय लिहिलं ते तुझ्या बद्दलच ना मग ते तू त्याच्या मागे वाचलं तर काय बिघडणार... आणि त्याने तुझ्यासाठीच लिहून ठेवले आहे ना मग इतका विचार कश्यासाठी? का स्वतःला त्रस्त करून घेतोस?

खरे पाहता हे सारे विचार त्याचेच, त्याच्याच मनातले जे त्याने बॉक्सच्या रूपाने समोर आणले आणि स्वतःची बाजू भक्कम करू लागला... त्याच मन अस्वस्थ झालं म्हणून तो विचारांच्या आहारी जाऊन बसला...

आपण तसंच काहीसं करतो नाही का? जेव्हा एखादी गोष्ट आपल्या मनावर ताबा मिळवते, मन द्विधा अवस्थेला जाते काय करावं काय नाही? याचा निर्णय घेता येत नाही तेव्हा जे मनाला योग्य वाटतं तिकडे आपण कलतो पण दुसऱ्या कोणत्यातरी बहाण्याने, निमित्याने मनासारखं करायला, वागायला पाहतो...

तरी तो तसाच पडून राहिला कारण आता रात्र खूप झाली याची जाणीव त्याला होती यावेळी उठून पुन्हा तो बॉक्स खाली काढून ते कुमारने लिहिलेलं वाचत बसणं त्याला योग्य वाटलं नाही... मोठ्या धीराने ते विचार दूर सारत तो शांत झाला आणि कोण्या एका क्षणाला त्याची समाधी लागली, तोसुध्दा झोपला...

## २७. आभास

इकडे दुसऱ्या शहरात -

त्यांनी सोबतच चहा घेतला... काही वेळ आज ऑफिसात दिवस कसा गेला... ते तो तिला सांगत होता पण नेहमी सारखं तिचं आज त्या गोष्टींत मन रमत नव्हतं... खरं तर तिचं मन हरवलं होतं... कुठे? तर कुमारच्या डायरीत... ती त्याच्या समोर जरी बसून होती पण तिचं मन दूर कुठेतरी डायरीत जे काय आतापर्यंत तिने वाचलं होतं त्यातच अडकून होतं आणि आणखी पुढे काय? यासाठी ती आतुर झालेली... कदाचित म्हणूनच ती तिथं असूनही तिथं नव्हती तर जे काय वाचलं ते पुन्हा पुन्हा आठवून जणू ती स्मरण करू लागली... तो ऑफिसात कशी एकाची आज फजिती झाली म्हणून सांगू लागला आणि त्याला हसू आलं, तिचा काहीही प्रतिसाद मिळाला नाही तेव्हा -

तिला नजर रोखून पाहत "कुठे हरवलीस?"

ती जणू उघड्या डोळयांनी स्वप्न पाहत होती आणि तिला त्याचा आवाज ऐकू आला नाही...

तिच्या हाताला स्पर्श करून "ओ माय डिअर वाईफ... कुठे आहेस?" किंचित हळुवार - इतक्या लवकर झोपली कि काय?

त्याचा स्पर्श तिला जाणवला अन ती वास्तवात परतली... जरा वेळ दोघांची नजरानजर झाली. तिला एव्हाना कळलं की तो जे काय बोलला त्याकडे आपलं काहीही लक्ष नव्हतं...

“तुझं आज कुठे लक्ष आहे ..?”

“इथेच तर आहे...”

“मी तुला आज ऑफिसला काय गंमत झाली म्हणून सांगितली तर तू त्यावर काहीच प्रतिक्रिया दिली नाही...”

“जरा विचार करत होते... सॉरी हं..”

“विचार??? पण कशाचा? काही प्रॉब्लेम आहे का? बरं वाटतं नाही का?”जवळ जाऊन तिच्या कपाळाला तळहात लावून त्याने विचारलं...

“मला काही झालं नाही...”

“मग कसला विचार... यापूर्वी असं कधी झालं नाही... म्हणून...”अन तो मध्येच बोलणं थांबवून तिला पाहत राहिला..

“मी विचार करत होते की आज जेवायला काय बरं बनवायचं ..?”कसातरी तिने विषय बदलविण्याचा प्रयत्न केला.

“अच्छा, असं होय तर... बनव ना काहीपण... त्याचा इतका विचार करायचा नाही...”

“बरं ठीक आहे.”म्हणत तिने चहाचे कप, स्ट्रे टेबलवरून उचलले, ती किचनकडे निघाली... त्याने टी व्ही सुरू केला, तिने चहाचे भांडे धुवून घेतले आणि  स्वयंपाक करायला सुरुवात केली... आज ती जरा घाईघाईत स्वयंपाक बनवू लागली, लवकर जेवण करून तिला डायरी वाचायची होती... ती जरी किचनमध्ये स्वयंपाक करत होती पण मनात सारखे कुमार आणि त्याने डायरीत जे काय लिहिलं ते घोळत होतं...

तिने गरम गरम जेवण पटापट डायनिंग टेबलवर ठेवलं, त्याला जेवायला वाढलं असं सांगतच ती ताट वाढायला लागली.

“आलात का? हात धुवून घ्या आणि जेवायला या ...”किचनमध्ये जाऊन फ्रीजमध्ये ठेवलेली  पाण्याची बॉटल बाहेर काढत ती म्हणाली...

स्वतःशीच ' आज स्वयंपाक जरा लवकर झाला वाटतं... छान, तशी आज भूक लागली आहे... '

असं काही पुटपुटत तो धुतलेले हात टॉवेलने पुसून जेवायला बसला... तिने ताट वाढून, पाण्याचे ग्लास भरून ठेवले होते... जेवण सुरु झालं आणि रोजच्यापेक्षा जरा लवकर आटोपलं... त्याच जेवण होईपर्यंत ती तिथंच थांबली, त्याचे जेवण आटोपताच तिने पटकन आवराआवर केली...

न राहवून त्याने विचारलं”तू जेवण लवकरच आटोपलं..?”

“झोप येत आहे ना म्हणून...”नाईलाजाने तिला खोटं बोलावं लागलं.

"ठीक आहे, जा तू झोप... मी बाजूच्या रूममध्ये काही ऑफिसचे काम बाकी आहे ते कॉम्पुटर वर पूर्ण करून घेतो.."

"बरं.."त्याला इतकंच बोलून ती बेडरूम मध्ये आली, आत येतांनी तिने दार किंचित उघड राहील असे हळूच मागे ढकललं... तिने लगबगीने डायरी हाती घेतली, ती बिछान्यावर पाय लांब करून उशी पाठीला लावून पान वाचू लागली...

कुमारने डायरीत पुढे लिहिलं होतं -

*कॉलेजला असतांना बऱ्याच नवीन गोष्टी माहीत झाल्या. ज्यांची शाळेत असतांना मुळीच कल्पना नव्हती. त्यापैकीच एक म्हणजे वेलेन्टाइन डे... मला बारावीला असतांना कळलं की हा दिवस का साजरा केला जातो आणि नेमकं कोण कोण साजरं करतं पण माझ्या मनात विचार आला की आपल्या जीवनात तर असं कुणीच नाही हा दिवस साजरा करायला... 14 फेब्रुवारी ला अजून दोन दिवस बाकी होते, मी असाच कबीर जवळ बसून होतो... मनात वेलेन्टाइन डे आणि सोबतच प्रेम म्हणजे नेमकं काय? एखाद्याला प्रेम झाल्यावर कस कळतं असेल? प्रेम करावे लागत कि आपोआप होऊन जातं? मला प्रेम झालं तर मला कसं कळेल आणि कधी होईल की होऊन गेलं? मग झालंच आहे तर ती आहे कोण?*

*अन दुसऱ्या क्षणी तीच नावं ओठांवर आलं"कीर्तीप्रिया...?"*

*नाही, असं कसं शक्य आहे... आम्ही तर चांगले मित्र मैत्रीण आहोत. तरी मनात राहून राहून येत होतं नेमकं काय होतं असेल प्रेम झालं की? प्रत्येकाला प्रेम होतंच का ?*

*कित्येक प्रश्न मी मलाच विचारत होतो आणि कबीरला मध्येच काय दोस्ता काही मदत मिळेल का? गंमत म्हणून विचारत होतो...*

*वेलेन्टाइन आला तसा गेला पण मला माझ्या प्रश्नाचं  उत्तर मिळालं नाही... खरं तर मी तेव्हा शोधायचा प्रयत्न केला नाही, जर केला असता तर आज परिस्थिती काही वेगळी राहिली असती...*

*तेथून पुढे काही दिवसांनी बारावीची शेवटची परीक्षा सुरु झाली होती आणि मध्येच होळीचा सण होता... दुसऱ्या दिवशी रंगपंचमी... मी लहानपणापासून रंग कुणालाच लावला नव्हता आणि कुणी मलाही लावला नव्हता. मला रंग खेळायला बिलकुल आवडत नव्हतं, कुणी रंग लावू नये म्हणून दिवसभर लपून राहायचो, मित्र जरी आले तर त्यांना तसाच कटवायचो...*

*रंगपंचमीचा दिवस उजाळला होता, सर्वजण सकाळपासून आहे ते सारे रंग लावून विदूषक बनले होते आणि गाव एक सर्कस... मी दरवर्षी प्रमाणे घरात दार लावून लपून होतो आणि खिडकीतून बाहेर रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या सर्वांचे काय ताल झाले आहे पाहून आनंदी होत होतो... दुपारी बारा  नंतर बाहेरच वातावरण जरा शांत झालं होतं तसा मी कसातरी बाहेर पडलो आणि सरळ धावत जाऊन कबीर जवळ पोहोचलो... भरभर झाडावर चढून जमेल तितक्या वर जाऊन बसलो... तिथून जरा दूरच्या शेतात मुलं एकमेकांना रंग लावण्यासाठी पळधाव करत होते. मी त्यांना पाहूनच खुश होतो. चार पाच तास सहज निघून गेले आणि मी घरी परतलो, सायंकाळ पर्यंत जवळपास सगळे दिवसभर लावलेला रंग निघेल तितका धुवून टाकत होते. क्वचितच कुणी कुणाला संध्याकाळी रंग लावत असे म्हणून मी बाहेर निघालो होतो...*

*ती समोर होतीच, बाहेरच्या अंगणात पाणी शिंपत होती... मी आज लक्ष नाही असं काहीसं दाखवत खाली नजर करून जात होतो. माझ्या पायापर्यंत पाण्याचे काही थेंब आले होते.*

*मला वाटलं होतं की तिने चुकून शिंपले असावे अन मी बेसावध पुढे चालत होतो, अन काही क्षणात पावसाच्या काही सरी झरकन अंगावरून गेल्या असा आभास झाला होता... मनात आलं भर उन्हाळ्यात असा अचानक पाऊस आला तरी कसा?*

*समोर नजर वर करून पाहिलं तर ती हातात रिकामा मग घेऊन, हसतच*

*"हॅप्पी होली... कुमार"*

*मी आधी भिजलेले कपडे पाहिले, पाण्यात रंग तर नाही ना म्हणून... मी वाचलो फक्त पाणी होतं... मला थोडा राग आला होता पण तिच्याकडे पाहून पूर्ण केव्हाच ओसरला होता.*

*मी तिच्या जवळ गेलो... एक हात हळूच खिश्यात टाकला आणि हलकेच तिच्या गालाला स्पर्श करून -*

*"सेम टू यु... किर्तीप्रिया"*

*"हे काय तू खरंच मला रंग लावला?"*

*"हो. तु माझ्या अंगावर पाणी शिंपले मी तुला थोडा रंग लावला..."*

*"मी फक्त पाणी शिंपले. मला रंग बिलकुल आवडत नाही आणि मी कधीच रंग लावला नाही अन कुणालाच लावू दिला नाही... छे!"*

*“बरं तुला एक सांगतो की हा रंग पाण्याने लवकर धुतला नाही ना तर आठवडाभर जात नाही”*

*“अरे देवा, मग मी कॉलेजला कशी जाणार... कुमार तू, तू ना..”*

*ती पुढे काही बोलणार तोच तीच बोलणं मध्येच तोडून”आधी लवकर चेहरा धुवून घे, मग भांडू हवं तर...”*

*काहीही न बोलता तिने मग भरून पाणी घेतलं, एक हातावर ओतून चेहऱ्यावर शिंपडले...”कुमार रंग निघाला का?”*

*“नाही, अजून तरी नाही.”*

*तिने परत एकदा पाणी शिंपडले”आता?”*

*“तू हाताने साफ का करत नाही?”*

*“शाब्बास, म्हणजे पूर्ण चेहरा भरवायचा तुझा विचार आहे तर...”*

*“नाही तसं नाही काही”*

*तिने पटापट तीन चार वेळा चेहऱ्यावर पाणी शिंपडले...*

*“आता वर बघ जरा..”*

*तिने चेहरा वर केला, कळलं नाही का पण तिला तसंच पाहत राहावंसं वाटलं होतं... मी पाहत राहिलो...*

*“कुमार, निघाला का? कि आहे अजून?”*

*“हो आता निघाला ...”*

*तिने पाण्याचा मग माझ्या हातात दिला. तिने ओढणीने चेहरा पुसला... राग अजून होताच.*

*“येतो मी...”*

*ती काहीच बोलली नव्हती... मी दोन एक पावलं चाललो आणि थांबलो. तिला आवाज दिला”किर्तीप्रिया”*

*“आता काय आणखी?”*

*तिचा चेहरा खरंच बघण्यासारखा झाला होता आणि तिने मला पाण्याचा मग दिला तेव्हा जरासं पाणी मी ओंजळीत घेतलं होतं तिथूनच तिच्या दिशेने हाताला झटका देऊन काही थेंब फेकले... बस ती माझ्यामागे मारायला धावणार अन मी तेथून पळ काढला होता.*

*हा किस्सा कबीरला दुसऱ्यादिवशी सांगितला होता. मी कितीतरी वेळ एकटाच हसत होतो, कारण ही तसंच होतं...*

*“कबीर, खरं तर काल जेव्हा तिने मला पाण्याने भिजवलं तेव्हा असं वाटलं होतं की जणू सारे रंग तिने त्या पाण्यात मिसळून माझ्यावर शिंपले, मला राग आला होता खरा पण तिला पाहून पूर्ण राग ओसरला.. का? मला ठाऊक नाही आणि जेव्हा ती चेहरा धुवत होती तेव्हा तिला सारखं पाहत राहावं असं वाटतं होतं, ते जाऊ दे तेव्हाच एक विचार मनात असाही आला होता की ती बकेट उचलून तिला चिंब भिजवून टाकावं पण मला तसं करणं पटलं नाही...”*

*“आणि हो, कबीर, एक गोष्ट तर तुला सांगायची राहूनच गेली. मी तिची काल चांगलीच फजिती केली, मी तिला रंग लावलाच नव्हता, तिची गंमत करावी म्हणून तिच्या गालाला रंग लावला असं भासवून तिला चार पाच वेळा चेहरा धुवायला लावला...”*

*मला माझंच हसू आवरत नव्हतं कितीतरी वेळ मी नुसता हसत होतो.. अगदी पोट धरून लोटपोट हसलो आणि शेवटी कसतरी हसणं थांबवलं, आवरलं तर गाल दुखत होते...*

*कबीरला मनातलं बोललं कि खूप हलकं हलकं आणि प्रसन्न वाटत होतं... कधी वाटायचं की माझं आणि कबीरच नातं या जन्माच मुळी नाहीच तर आम्ही जन्मोजन्मीचे सवंगडी असणार..*

तिने जरावेळ डायरी तशीच हातात घेऊन बाजूला केली, तिचं आतापर्यंत हसण्यावर ठेवलेलं नियंत्रण सुटलं अन तो प्रसंग पुन्हा पुन्हा आठवून ती पोट धरून हसायला लागली... काही क्षणांत हसू अनावर होऊन डोळयातून ओसंडत पापण्यांवर जमा झालं अन गालावर ओघळत खाली उतरलं, मग राहून राहून एक दोन ओझरते हश्याचे ध्वनी तिच्या ओठांतून बाहेर आले आणि त्या रूममध्ये विरले. तिला काही वेळाने एकांताची जाणीव झाली, त्याचबरोबर रात्र असल्याची आणि तहान लागल्याचीसुध्दा...

ती बेडवरून उठली, बाहेर आली आणि किचनमध्ये जाऊन ती फ्रिजमधून थंडगार पाण्याची एक बॉटल सोबत घेऊन परतली... परत येतांनी तिने सहज एक नजर तो ज्या रूममध्ये काम करत होता तिकडे  फिरवली, तो कामात व्यस्त असल्याचं तिला दिसून आलं... तिने रूमचा दरवाजा उघडला, ती आत गेली...

“अहो, किती काम करताय? झालं की नाही अजून?”

“थोडं बाकी आहे... तू कश्याला उठली?”

“तहान लागली होती म्हणून पाणी आणायला...”

“बरं, जा तू झोप, मला आणखी जरा वेळ लागेल..”

पाण्याची बॉटल त्याच्या समोर धरून”तुम्हाला हवंय का पाणी..?”

त्याने होकार देऊन पाण्याची बॉटल हाती घेतली... तो दोन चार घोट पाणी प्यायला...

ती बॉटल सोबत घेऊन बेडरूम मध्ये आली, दार जरा लोटलं... तिने भिंतीवर लावलेल्या घड्याळावर एक नजर टाकली तर रात्रीचे जवळपास 9:30 वाजलेले, तिने ट्युबलाईट बंद केला आणि नाईट लॅंम्प सुरु केला, तिने बिछान्यावर अंग टाकलं...

**२८. गतकाळ**

ती बराच वेळ बिछान्यावर पाठ टेकवून बसलेली होती आणि दुपारी घाई घाईत काम केल्याने तिला जरा थकवा जाणवत होता. तिने एकावर एक अश्या दोन उश्या ठेवल्या, जरा खाली सरकून तिने त्यावर मान टेकवली. डायरी हातात घेऊन वाचतांना बरोबर उजेड येत आहे कि नाही म्हणून तिने एकदा वाचून पाहिलं आणि हवा तितका प्रकाश डायरीच्या कागदांवर पडत नसल्यामुळे तिने तो नाईट लॅम्प जवळ ओढला. आता ती पूर्ण बिछान्यावर झोपून, किंचित मान वर ठेवून, दोन्ही हाताचे कोपर गादीत रोवून, हाताने डायरी नीट पकडून पुढे वाचायला लागली...

कुमारने डायरीत समोर लिहिलं होतं...

*काही दिवसांतच माझी बारावीची परीक्षा संपली होती आणि उन्हाळी सुटीला सुरुवात झाली होती... मग काय कबीर आणि पुस्तक यांच्या सहवासात पुन्हा एकदा वेळ मजेत जात होता,नवनवीन वाचायला मिळत होत, शिकायला मिळत होत... दुपारचा वेळ खेळण्यात जायचा तर कधी कुणाच्या शेतात जाऊन आंबे पळवून आणण्यात असे दिवस जात होते... यावेळी एक नवीन गोष्ट आवडीत जुळली ती म्हणजे सिनेमा अन त्यात होणारी मारामारी, गाणी... बरंच काही..*

*दररोज एक दोन सिनेमा पाहून व्हायचा, सिनेमातील गाणी नकळत आपलीशी वाटायला लागली होती, तोंडपाठ झाली होती... एकांतात ओठांवर एखादं दुसरं गाणं येत होत आणि त्यातील भाव मनाला स्पर्श करून जात होते...*

*मला प्रेम म्हणजे काय? आणि त्यासंबंधीत जे काही प्रश्न निर्माण झाले होते त्यापैकी बऱ्याच प्रश्नांची उत्तरं मला हिंदी आणि मराठी चित्रपट यांतून मिळाली होती... प्रत्येक वेळी नवीन काहीतरी भन्नाट सिनेमात व्हायचं, नवनवीन अभिनेता आणि अभिनेत्री असायचे... सिनेमात घडणारे कधी आपलंसं वाटायचं आणि कधी नव्हे तर मला सिनेमा पाहायचा जणू काही छंद जडला, रोजच सिनेमा पाहायचा म्हणून मनाला आतुरता लागलेली असायची...*

*कधी अभिनेता ऐवजी स्वतःला त्यात असल्याचा भास व्हायचा इतका सिनेमाशी एकरूप होऊन जायचो मग वेळेचं भान राहत नव्हतं... दुपारचा वेळ असाच निघून जात होता, सिनेमातील अभिनेत्यासारखी केसांची वळण लावण्याची नकळत सवय झाली आणि कधी आवडत्या अभिनेत्याला मारेकरी मारहाण केली कि आपण त्यांना मारावं असं वाटून जायचं तर अभिनेता कधी कधी मरण पावला कि खूप वाईट वाटायचं... आता कसं व्हायचं? त्याच्या कुटुंबियांचं काय होईल? असे बिनकामाचे प्रश्न पडायचे, अभिनेता इतक्यात मरायला नको होता... असं मनात येऊन जायचं पण दुसऱ्या सिनेमात तोच अभिनेता पुन्हा आला कि इतका मार खाल्ला, भळाभळा रक्त गेलं आणि मेल्यावर चितेवर जाळतांनासुध्दा दाखवलं मग तो अजून जिवंत कसा? हाही एक मोठा प्रश्न मला पडायचा...*

*काही दिवसांनी हळूहळू समजून आलं की सिनेमातील सर्वकाही तेवढ्यापुरते असते आणि खोटं खोटं म्हणून ते मरतात... मग ते एक वाईट वाटायचं खूळ मनातून निघून गेलं, सिनेमाची कथा आणि गाणी यांची आवड मात्र कायम होती...*

*माझे पेपर जरी संपले पण तिची अकरावी चे पेपर व्हायचे होते. मी कॉलेजला जायचं काहीएक कारण नव्हतं पण तिला भेटायचं म्हणून कधी कधी ती पेपर देऊन परत यायच्यावेळी नेमका तिच्या मागावर राहायचो हि शक्कल मला सिनेमाने शिकवली होती आणि काही तिच्याशी संपर्क साधावा यामुळे आचरणात आली होती...*

*एकटा असतांना, तर कधी कबीर सोबत तिच्या सोबत बोलतांना नकळत तिचं रूप न्याहाळायला लागलो होतो... तिला पाहतांना मन कुठेतरी हरवलं असं वाटायचं याआधी असं मी कधीच कुणाच्याच बाबतीत अनुभवलं नव्हतं हे सारं काही माझ्यासाठी नवं होतं... तिला आठवतांना नकळत सिनेमातील अश्यावेळेत अभिनेत्याने गायलेली गाणी गात बसायचो तर ती समोर असतांना सिनेमातील एखादा प्रसंग आम्ही दोघे अभिनेता आणि अभिनेत्री जसे मला भासायचो...*

*असं का वाटायचं याचं उत्तर मला मिळत नव्हतं त्याला कारण म्हणजे तेव्हा मी शोधायचा प्रयत्न केला नाही... मला तितकंसं आवश्यक वाटत नव्हतं... बस असाच अनुभव येत राहो हि एक इच्छा मनात होती... तिचा सहवास, बोलणं नेहमी असंच राहावं यापलीकडे कोणतीच आशा, अपेक्षा नव्हती...*

*मला मित्र म्हणूनच तिच्यासोबत जुळलेलं नातं जास्त आवडलं होत... हक्काचं, गंमतीचं, थट्टा मस्करीचं... दोघेही मनात आलं ते बोलून टाकायचो बोलतांना विचार करावा असं कधी वाटलं नाही तशी वेळ येतच नव्हती ना कधी आली...*

ती मन लावून डायरीत आणखी काय लिहिलं ते वाचत असताना अचानक नाईट लॅम्प बंद झाला अन पाठोपाठ पंखा मंद गतीने फिरत तोही थांबला... संपूर्ण खोलीत अंधार पसरला, बाजूच्या टेबलवर हाताने चाचपडत तिने मोबाईल शोधला, टॉर्च लावला आणि समोर वाचायला लागली... दोन चार ओळी वाचल्या न वाचल्या तर तिला घामानं कपाळ भिजल्याचं जाणवलं... पंखा बंद पडताच तिल उकळायला लागलं पण कुमारने आणखी काय लिहून ठेवलं याची उत्सुकता तिला स्वस्थ बसू देत नव्हती... अखेर काही वेळातच तिला चिंब घाम फुटला न राहवून तिने

डायरी तशीच जिथपर्यंत वाचून झाली तशीच उलट बिछान्यावर ठेवली, ती बेडरूमच्या बाहेर आली...

उजव्या हाताने कपाळावर आलेला घाम पुसत, डाव्या हातात मोबाईलचा टॉर्च समोर करून तिने त्याला हाक मारली...

“अहो, लाईट गेली ना...”

हातात मोबाईल घेऊन तो बाहेर येत”हो, अचानक कशी काय लाईट गेली?”

“तुम्ही तरीही आतच बसून आहात..?”

“लाईट गेली अन मी लगेच मोबाईलचं इंटरनेट सुरु केलं...”

“अस होय, तरी म्हटलं मला आत किती उकळत होतं आणि तुम्ही आतून बाहेरपन आला नाहीत...”

“बरं ते जाऊ दे, चल बाहेर मस्त गार वारा सुटला असेल आपण गच्चीवर जाऊया...”

“चला”म्हणत तिने होकार दिला आणि दोघे गच्चीवर आले...

त्याचा अंदाज खरा होता... बाहेर गार वारा सुटलेला, जरा निळसर आभाळ... जणू चांदण्यांची चादर अंगावर ओढून, दिवसभर पूर्वेकडून पश्चिमेकडे रोजचाच निसर्गाने ठरवून

दिलेला प्रवास करून थकलेला सूर्य झोपी गेलेला, चंद्राची मनमोहक कोर लक्ष वेधून घेत होती... मध्ये एखादी चांदणी चटक होऊन मंद मंद प्रकाशात चमकत होती...

घामाने चिंब शरीराला गार वारा स्पर्श करून गेला आणि जागीच गोठल्यागत दोघे तसेच उभे राहिले... तो गार वारा त्यावेळी न थांबता तसाच निरंतर वाहत राहावा असं त्यांना वाटलं... वाऱ्याची ती झुळूक झरकन आली अन निघून गेली त्या क्षणिक सुखाने वेळेचं म्हणजे लाईट गेलेली आहे आणि आरामात झोप घ्यायची वेळ आहे याचे भान हरपून ते दोघे झोपाळ्यावर बसले... हळूहळू झोपाळा पायाने झुलवत वर पाहू लागले... चोहीकडे अंधार पसरलेला , वर नयनरम्य देखावा कुणी कलाकाराने आजन्म मेहनतीने डोळ्याचं पारणं फिटाव इतकं मोहक चित्र साकाराव तसे ते मग्न होऊन त्या क्षणाचा आस्वाद घेत असता यासर्वांत मध्येच कुठेतरी लाल रंगाचे चमचम करत सरकतांना दिसलं...

“अगं ते बघ”

जरा आश्चर्याने”कुठे? कुठे?”

तिला बोटाने दाखवत”ते तिथे बघ, लाल रंगाची चांदणी..”

पटकन वर अन लगेच त्याच्याकडे नजर वळवून”लाल रंगाची चांदणी, माझा वरचा मजला काही रिकामा नाही...”

जरा हळू आवाजात स्वतःलाच ऐकू येईल असे ' काय बोलतेस...? '

“काय म्हणालात?... विमान आहे ते...”

“खरं कि काय? मला वाटलं आज लाल रंगाची चांदणी आली आभाळात... रोज रोज तोच एक रंग लावून कंटाळली असेल तर केला आज लाल रंगाने मेकअप...”तिला रोखून पाहत तो म्हणाला...

ती खळखळून हसली... तो तिला पाहतच राहिला, बऱ्याच दिवसांनी ते दोघे जण एकत्र झोपाळयावर बसले होते... जुन्या काही गच्चीवरच्या आठवणी एकमेकांना सांगत बराच वेळ झाला आणि गतकाळात रमलेल्या त्या दोघांना अचानक बाजूचा लाईट सुरु झाल्याने, लख्ख प्रकाश पडल्याने भान आलं... तिने त्याच्या खांद्यावर ठेवलेली मान न राहवून काढली, दोघे गतकाळातून परत वास्तव्यात सोबत परतून आले...

ते झोपळयाहून खाली उतरले, तिने हात वर उंचावून जांभई दिली अन तिला पाहून त्यालाही जांभई आली... सवय दुसरं काय... दोघे पाठोपाठ जिना उतरून हॉलमध्ये आले... तो उरलेलं काम पूर्ण करायचं म्हणून पुन्हा त्याच्या रूममध्ये गेला आणि ती बेडरुममध्ये...

## २९. निमित्त

तिने दार उघडले... बाहेर येतेवेळी नाईट लॅम्प आणि पंखा बंद न केल्याने सुरूच होते... ती दार मागे ढकलून बिछान्यावर बसली, डायरी अलगद उचलून हातात घेतली... पुढे वाचायला सुरुवात करणार तोच मोबाईलचा टॉर्च सुरु असल्याचं तिला समजलं, आधी टॉर्च बंद करून स्वतःशीच ---' कुमारने आणखी काय लिहिलं? ' असं पुटपुटत ती डायरी वाचायला लागली...

कुमारने लिहिलं होतं...

*तेव्हा माझ्यात एक बदल झालेला मला समजून आला होता तो म्हणजे तिला भेटायचं म्हणून मी कोणता ना कोणता बहाणा शोधायचो. मग काही वेळा मला निमित्त साधून तिला भेटता यायचं पण दररोज भेटावंस वाटायचं मग रोज नवीन निमित्त थोडंच मिळत असतं तर भेटीची जशी सवयच झाली होती मग काय निमित्त असो वा नसो तिला भेटत होतो आणि ती तर नेमकं मी तिला जरा विसरलो किंवा मनात तिचा विचार समजा आला नाही की ती समोर हजर असायची मला काहीही कल्पना नसताना... तिला भेटायचं कोणतंच निमित्त मी सोडत नव्हतं... एक वेगळंच आकर्षण मला जाणवत होतं, आज तिला भेटलो कि जातेवेळी परत ती केव्हा दिसेल आणि कधी तिच्याशी बोलायला मिळेल मनात आस राहायची...*

*असेच दिवस जात होते आणि तिची परीक्षा संपली, कॉलेजला सुट्टी लागली... पण तिचे MS CIT चे क्लास काही दिवस सुरु होते आणि हेही एक तिच्या भेटीच निमित्त म्हणून काहीही काम नसतांना फक्त तिच्या सोबत बोलत जायला मिळेल म्हणून मी ती ज्या वेळेला क्लास ला जायची तेव्हा सायकल घेऊन तिला वाटेतच भेटत होतो आणि गप्पागोष्टी करत शहराला उगीचच जात होतो...*

*एकदा असाच कबीर जवळ बसून असतांना मनात आलं सुद्धा कधी ती दिसली नाही, तिची भेट झाली नाही, तिच्याशी बोलणं झालं नाही की मन उदास होऊन जायचं असं का व्हायचं? काहीएक कळत नव्हतं... का एक हुरहूर मनाला लागली होती? का तिला भेटावंस वाटायचं? का मन तिच्यात रमायचं? ती म्हणजे माझ्यासाठी काय आहे? का मन तिला न पाहता दिवसभर साधी ती ओझरती तरी दिसावी म्हणून बेचैन व्हायचं असे प्रश्न येत होते आणि मी कबीरला सहज सांगून मोकळा व्हायचो पण ते प्रश्न तसेच राहिले... मी त्यावर उत्तरं मिळवाचेच असं काही ठरवलं नव्हतं म्हणून बाकी कोणतीच उठाठेव केली नाही...*

*तेव्हा एक नवीन भर म्हणजे बॅडमिंटन खेळण्याचा उत्साह वाढला होता आणि एकदोन घर सोडून बाजूच्या घरी बॅडमिंटन असायचे.. संध्याकाळ झाली रे झाली की लहानमोठे सगळे आपापल्या अंगणात खेळायला जमा व्हायचे... आळीपाळीने बाद झाले की इतरांना खेळता येत असे...*

*मी सुजितला भेटून परत येत होतो, तर ती तिच्या अंगणात खेळत होती... आजूबाजूला बाकीचे काही शेजारीसुध्दा खेळाचा आनंद घेत होते... ती आवाज देऊन थांबवेल किंवा नाही म्हणून मीच मुद्दाम तिथं थांबलो... काहीवेळ असाच निघून गेला, बराच वेळ दोन्ही खेळाडू टिकून होते, ते हवेत इकडून तिकडे फुल बॅटने भिरकावत होते पण बराच वेळ झाला होता फुल काही खाली पडलं नाही... तिला मी तिथं सायकल वर बसून त्यांचा खेळ पाहत असल्याचं लक्षात आलं आणि तिचा अंदाज बहुतेक चुकला कि काय अन ते फुल खाली पडलं... दुसऱ्याक्षणी तिने मला आवाज दिला 'कुमार, ये आपण खेळूया... ' इतकं बोलून तिने दुसरी बॅट जवळ येऊन मला दिली... तिला टाळणं मला शक्य नव्हतं म्हणून आणि ती स्वतःहून बोलवत होती तर मी नाही तरी कसा म्हणणार होतो... बस मग काय घेतली बॅट अन मैदानात उतरलो, १० -१५ मिनिट झाली पण*

*फुल काही खाली पडल नव्हतं तर सर्व तिथं गोळा झाले होते आणि दोघांनाही चांगलाच हुरूप चढला होता...*

*मी जरा हलकेच बॅटने फुलं तिच्याकडे मारलं पण तिच्यापासून जरा जास्तच जवळ ते पोहोचलं अन घाईघाईत समोर येऊन तिने कसतरी माझ्याकडे सारायचं म्हणून बॅट हवेत उचलली अन तिचा पायात पाय अडकल्याने तोल गेला ती बस खाली पडणारच तरी तिने फुल बॅटने माझ्याकडे वळवले... मी मात्र बॅट खाली टाकून तिला सांभाळायला म्हणून तिला आधार दिला अन बाद झालो... त्याच मला काहीएक वाटलं नव्हतं पण जर का तिला लागल असतं तर नुसता विचार मनात आला अन मी विचारात हरवलो...*

*तिच्याकडे पाहिलं तर ती हसत होती, तिला मला हरवलं आणि पडता पडता सांभाळलं याचा कदाचित आनंद झाला होता... रोजच तिच्यासोबत बॅडमिंटन खेळण्याच्या निमित्याने भेट होत राहिली... तिच्याशी खेळतांना हरलो तरी एक वेगळाच आनंद होत असे... ती मनमुराद हसली कि तिच्या चेहरा खुलून दिसायचा मी  एकटक पाहत राहायचो...*

*एक दिवस बॅडमिंटन खेळतांना -*
*“कुमार, पुढच्या रविवारी माझी परीक्षा आहे..”*

*“परीक्षा? कसली?”*

*“MS CIT चे क्लास पूर्ण झाले तर त्याचीच शेवटची परीक्षा आहे..”*

*“बरं मग काय?”*

*“काही नाही बस सहज सांगितलं..”*

*“बाकी परीक्षेची तयारी पूर्ण झाली असेलच..”*

*“काही सराव प्रश्नसंच बाकी आहेत”*

*“मग रोज बॅडमिंटन खेळण्यात वेळ काय वाया घालते, यापेक्षा सराव करायचा..”*

*“दिवसभर उन्हामुळं बाहेर यायला मिळत नाही मग संध्याकाळी जरावेळ या निमित्याने...”*

*“ते हि बरोबर आहे...”*

*आठवडा भर्रकन निघून गेला आणि परीक्षेचा दिवस रविवार उजाडला... तिला पेपरला जाण्याआधी भेटलो होतो, best of luck बोलून आलो...*

असं डायरीत लिहिलेलं वाचून ती काही क्षण भूतकाळात हरवली... नकळत डोळे मिटले काही वेळ निघून गेला मनात पाठोपाठ पुन्हा विचारांचा थवा भिरभिर करून कोणा एका क्षणाला शांत झाला आणि ती वास्तव्यात परतली... बसून वाचायला तिला कंटाळा आला अन तिने पूर्णपणे बिछान्यावर झोपून, मान जरा वर राहील म्हणून उशी दुमडून घेतली.. दोन्ही पाय एकावर एक ठेवले, डायरी हातात डोळ्यासमोर धरली, हाताचे दोन्ही कोपरे गादीला टेकवले...

“आता जरा आरामदायी वाटतंय” स्वतःशी पुटपुटली... समोर काय लिहिलं आणखी? स्वतः स्वतःला प्रश्न करत ती पुढे वाचायला लागली...

## ३०. नशीब

नाईट लॅम्पचा मंद प्रकाश डायरीच्या पानांवर पडत होता, जरा नजर रूममध्ये इकडे तिकडे गेली की उजेड जणू नसल्याचं तिला भासत होतं... पंख्याचा गार वारा, नीरव शांतता असल्याने फिरणाऱ्या पात्यांचा गरगर असा आवाज तिच्या सोबतीला होते आणि कुमारची डायरी... मनात मध्येच येणारे काही विचार, आठवणी...

बिछान्यावर पूर्ण अंग टेकवून तिला बरं वाटलं... मनात येणारे विचारांचे वावटळ दूर करून तिने वाचायला सुरुवात केली...

कुमारने समोर लिहिलं होतं ---

*तिची MS-CIT ची परीक्षा झाली, मला ठाऊक होतंच कि ती पास होणार अन ती चांगले टक्के घेऊन पास झाली, मी तिला शुभेच्छा दिल्या होत्या तर तिने हसतच पेढा माझ्या हातावर ठेवला होता... काही क्षण हे कधीच विसरता येणार नाहीत याची मला आज जाणीव होते आहे... त्यावेळेला तिचा पाहिलेला चेहरा नकळत आजही डोळ्यांसमोर येतो... सोबत घेऊन येतो आठवणींचा पूर... मी त्या पुरात वाहत वाहत चिंब होतो, कधी मिटलेल्या डोळ्याने तर कधी आसवांनी भिजलेल्या डोळ्याने...*

*मी ज्या दिवसाची वाट पाहत होतो, तो दिवस जवळ येत होता... तिचा वाढदिवस... अचानक भेटून तिला आनंदाचा धक्का द्यायचा म्हणून त्या आठवडा भर तिला भेटायचं नाही असं ठरवलं होतं... जेणेकरून जर बोलता बोलता तिने मला सांगितलं की इतक्यात तिचा वाढदिवस आहे तर ' सरप्राईस ' तसंच राहिल असतं. तिला एकदम भेटायचं तर 18 एप्रिल ला... बरोबर ना कबीर.. ! मी जवळजवळ त्याला मिठी मारली होती...*

*आजवर अनेक ग्रिटींग कार्ड बनवले होते पण हे जरा जास्तच विशेष होतं... म्हणून दोन दिवस बरच डोकं, कितीतरी साहित्य गोळा करून, वेळ खर्च करून सरतेशेवटी 13 तारखेला कार्ड तयार झालं, एक काम तेवढं बाकी होतं To आणि From नंतर नावं लिहायची होती अन पहिल्या पानावर"वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा"बस्!*

*त्यासाठी कितीतरी पान सराव करून काळे निळे केले. बराच वेळ काय? तो पूर्ण दिवस निघून गेला पण ते तीन शब्द नेमके कश्या प्रकारे लिहावेत ठरवता आलं नाही... दुसरा दिवस कामाने सुरु झाला अन कामातच संपला... तारीख 15 एप्रिल, सकाळी सकाळी सारे कागद अन ते ग्रिटींग कार्ड घेऊन बसलो होतो, सर्वात जास्त आकर्षक असे ते तीन शब्दाचे लेखन शेवटी बनले... वेगवेगळे प्रकार एकत्र करून! सोबतच To नंतर किर्तीप्रिया तर From नंतर कुमार लिहून मोहीम यशस्वी झाली...*

*तिच्या वाढदिवसाला तिला हे ग्रिटींग कार्ड देतांना काय होईल? तिला आवडेल कि नाही? ती खुप खुश होईल मी विचारात हरवलो होतो, इतक्यात आवाज ऐकू आला... मला अजून आठवण आहे आणि नेहमीच राहील, आयुष्यभर.. !*

*"कुमार, झालं कि नाही, आवर पटकन आपल्याला आज गावाला जायचं आहे ना..."आईने मला हाक दिली होती, मला आठवण झाली की आम्ही सर्व बाहेरगावी लग्नाला जाणार होतो, दुसऱ्या दिवशी म्हणजे 16 तारखेला लग्न होतं आणि 17 ला परत येणार होतो पण माझं मन काही केल्या सोबत जायला तयार नव्हतं पण"एकटा घरी काय करशील? चल सोबत"म्हणत आईने तयारी करायला लावली होती... मग काय माझा नाईलाज झाला आणि आम्ही सर्वजण लग्नाला गेलो...*

*प्रवासात सतत मनात एकच विचार घोळत होता, 18 एप्रिल... वाढदिवस... ग्रिटींग कार्ड...*

*तिथं पोहोचल्यावर काही वेळाने नवीन मित्र झाले, मला बाकी गोष्टींचा विसर पडला होता... दुसरा दिवस लगबगीत निघून गेला, 17 ला स्वागत समारोह ते तरी बरं झालं की कार्यक्रम दुपारी होता, मला वाटलं होतं की सायंकाळी आम्ही परतीच्या प्रवासाला निघणार पण नातेवाईकांनी हट्टाने थांबवलं होतं... मग काय मानासाठी राहावं लागलं...*

*18 एप्रिल, ती अनपेक्षित पणे समोर होतीच... मी सायकल हळू चालवत जवळ जाऊन थांबलो होतो, तिला बिलकुल काहीएक माहिती नव्हतं...*

*“कुमार,इतक्यात दिसला नाही..”*

*“आम्ही सर्व लग्नाला गेलो होतो.”*

*“अस्स होय... कसा आहेस?”*

*“मजेत, तू सांग...”*

*“एकदम मस्त..”*

*“तेथून एक गोष्ट आणली, मी तुझ्यासाठी..”*

*“काय? बघू..”*

*“आधी डोळे मिट मग देतो”*

*तिने काहीएक न बोलता डोळे मिटले मी क्षणभर तिला पाहतच होतो..*

*“दे , इतका वेळ, मस्करी तर करत नाहीस”*

*“एक मिनिट थांब”म्हणत मी पांढरं गुलाब आणि ग्रिटींग तिच्या हातावर ठेवलं...*

*तिने डोळे उघडले, तिचा चेहरा खुलून आला ती काहीतरी बोलणार इतक्यात मला थंड पाणी ओतून चिंब भिजल्याचं जाणवलं अन सोबत हसण्याचा आवाज ऐकू आला पण कुणी दिसलं नाही... आजूबाजूला पाहतो तर चार भिंती, बाजूला गादीवर कुणीतरी झोपलेलं... मी स्वप्नातून परत आलो आणि मला जाणीव झाली की मी बाहेरगावी आहे आज काहीही करून गावी परत जायचं आहे पण माझं नशीब खोटं त्याला मी तरी काय करणार...*

*मी घरच्यांना हट्ट करून थकलो पण नातेवाईकांनी एका वाक्यात सारं संपवलं...”बाळा, तसं काही आईचं इकडे येणं होत नाही मग आता लग्नाच्या निमित्याने आले आहात तर दोन तीन दिवस राहा..”*

*मी मात्र पश्चाताप केल्याशिवाय काहीही करू शकलो नव्हतो... राहून राहून मला वाटतं होतं का मी सोबत लग्नाला आलो? का? का मी घरीच थांबलो नाही? घरी एकटा राहिलो असतो तर बरं झालं असतं... किती उठाठेव केली होती सारं काही मातीत गेलं होतं. याचं मला दिवस बुडाला, रात्र होऊन सकाळ उगवली तरी वाईट वाटत होतं... आजही वाटतं... !*

*नातेवाईकांची मर्जी ठेवून आम्ही दोन तीन दिवसांनी गावी परतलो... घरी येताच मी ग्रिटींग कार्ड घेऊन सरळ कबीरजवळ गेलो होतो... त्याला पाठ टेकवून बसलो होतो, कार्ड हाती घेऊन एकटक पाहत होतो अन डोळयात आसवं आले, पापण्या ओल्या झाल्या, पापण्यांचे बांध मोडून आसू गालावरून खाली उतरले, काहि त्या कार्डवर पडले होते... ज्या दिवसाची मी किती वाट पाहिली होती तो दिवस, तो क्षण मी गमावून बसलो होतो... नवीन वर्ष्याच्या शुभेच्छा देण्यासाठी आधी जसं कार्ड बनवलं होतं पण एक आठवण म्हणून तसेच ठेवून द्यावं लागलं होतं, या कार्डच्या नशिबात तेच होत, माझ्याबाबतीत हि असंच काहीसं!*

तिने डायरी तशीच धरून नजर बाजूला सारली... पुन्हा नव्याने विचारचक्र सुरु झालं... विचार जणू लाटा पायांवर पाठोपाठ याव्यात तसे मनात येत होते... खरंच कुमार तुला समजणं सोप्प नव्हतं, नाही... तू मनात काय काय लपवून ठेवलं ते आज कळत आहे. ते हि एका दुर्दैवी कारणाने, दुःखद घटनेने, तुझ्या अचानक झालेल्या अपघातामुळे, सुजीतच्या हातून नकळत चूक झाल्याने... हेच आहे का मग नशीब? नशीब... जे काय लोक म्हणतात, नशिबात जे आहे ते वेळ आली की घडतं... कि नियतीचा हा नवीन खेळ आहे? ज्याची कुणाला काहीएक कल्पना नाही... यामागे काय संकेत असावा? काय हेतू असावा? कुणास ठाऊक..?

शेवटी नशीब कुणास ठाऊक होतं? कुणास ठाऊक आहे? कुणास ठाऊक असेल...???

तेच ते प्रश्न मनात पुन्हा पुन्हा येऊ लागले, ती नकळत मनात येणाऱ्या प्रश्नांना आहारी जाऊन तिला जरावेळ वास्तवाचं भान राहील नाही... कुमार अन त्याची डायरी तिला वेगळयाच दुनियेत घेऊन गेले असं तिला वाटलं... विचार करत असता तिने कधी डायरी बंद केली तिला कळलं नाही, एका हातात ती डायरी... दुसरा हात आडवा करून मस्तकावर ठेवलेला... नजर गरगर फिरणाऱ्या पंख्याच्या पात्यांवर रोखलेली ती, विचारांत बुडून गेली...

कधी कधी असंच होतं... नाही? मन शांत असले की अचानक एखाद्या गोष्टीचा विचार करत, कुण्या प्रश्नाचा पाठलाग करत आपण वेळेचं भान हरपून जातो... आपल्याला आजूबाजूच्या वास्तविकतेचा विसर पडतो आणि मन जुन्या आठवणीत रमत तर कधी विचलित होतं...

इतक्यात दार उघडलं अन तिची समाधी भंग पावली... ती आठवणींच्या देशातून परतली, समोर तो जांभई देत आत येताना तिला दिसला.. पटकन कूस बदलायचं दाखवून तिने डायरी उशीखाली ठेवली, डोळे मिटले... तो बिछान्यावर पहुडला... रात्रीचे अकरा वाजलेले, दिवसभर कामात व्यस्त अन बराच वेळ जागा राहिल्याने त्याला लगेच झोप लागली...

तसं पाहिलं तर झोपेची काही ठराविक वेळ नाही... हा रोजच्या सवयीचा भाग आहे... नाहीतर मनात विचारांची गर्दी झाली, न उलगडणारे प्रश्न पाठोपाठ डोक्यात आले तर रात्र संपते पण झोप उडाली असते... रात्रभर मनात सुरु झालेले विचारयुद्ध सकाळ झाली तरी सुरूच असते तर कधी कधी आयुष्यभरसुध्दा... !

## ३१. स्वप्न आणि सत्य

ती काही वेळ तशीच बिछान्यावर डोळे मिटून होती... तिच्या बंद पापण्यांच्या पडद्यावर तिला काही परिचित अपरिचित चित्र दिसू लागली... ती फक्त विचाराधीन मनाला ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करु लागली... तिला एकवेळ नजरेसमोर दवाखान्यात पाहिलेला कुमार दिसला, तिने डोळे उघडले... किंचित मान वर करून तिने हळूच बाजूला नजर फिरवली तर तो पलीकडे तोंड करून झोपलेला तिला दिसला, परत एकदा खात्री करून तिने डायरी हातात घेतली... तीने पुढे वाचायला सुरुवात केली...

कुमारने डायरीत समोर लिहिलं होतं...

तिचा वाढदिवस होऊन जवळपास एक आठवडा झाला होता पण तरीही केवळ बाहेरगावी जावं लागलं अन वेळेवर परत न आल्याने मला तिला स्वतः इतक्या मेहनतीने, उत्सुकतेने बनवलेलं ग्रिटींग कार्ड तर देता आलं नाही... साधं विशसुध्दा करायला मिळालं नाही याच दुःख वाटतच राहिलं... एका महिन्यांनंतर जरा मला त्या गोष्टीचा विसर पडला होता.. उन्हाळ्याच्या सुट्ट्या अजून बाकी होत्या...

एप्रिल संपून मे महिना सुरु झाला, सुटीचा मनसोक्त आनंद लुटत होतो... तिला रोज भेटणं, बोलणं जणू रोचच्या दिवसाचा एक भाग झाला होता... तो दिवस उगवला... बारावीचा निकाल लागला म्हणजे माझापण.. ! अपेक्षित होते तेवढे टक्के मिळाले होते आणि पहिल्याच प्रयत्नात पास झालो याचा आनंद झाला होता... घरी सगळे आनंदी होते... तिला भेटलो तेव्हा तिने हात मिळवत शुभेच्छा दिल्या...

“कुमार, अभिनंदन...”

“किर्तीप्रिया, धन्यवाद!”

“आता तू पदवीला जाणार.. मज्जा आहे मग आता..”

“हो, पण मज्जा कसली?”

“मस्त पैकी पदवीला असलं की मॉर्निंग कॉलेज असतं ना..”

मी याचा विचार केला नव्हता मग मनात आलं होतं ' सकाळचं कॉलेज... हिचं दुपारी कॉलेज असणारं.. अरे यार.. '

"कुमार, कुमार.. कुठे हरवला”

भानावर येऊन”काही नाही”

“तुझ्या नोट्स असतील ना?”

“आहेत.”

“कुणाला देऊ नको.. मला पाहिजे..”

“बरं ठीक आहे, येतो मी...”

“पुन्हा एकदा अभिनंदन”

यावेळी मात्र मी तिच्या हसऱ्या चेहऱ्याकडे पाहतच राहिलो होतो... काहीही न बोलता... एकटक!

सायकल घेऊन घरी आलो... मनात बरेच विचार येत होते... बारावी उत्तीर्ण झाल्याचा आनंद, पदवीचं पहिलं वर्ष सुरू होणार होत, नवनवीन मित्र आणि बरंच काही नवीन शिकायला मिळणार होत, सकाळी कॉलेज झालं की दुपारचा मोकळा वेळ मिळेल हे सर्व विचार एकीकडे अन कॉलेजला जातांना, येतांना आता तिला भेटण्याचं निमित्त यापुढे राहणार नाही... याचं थोडं वाईट वाटलं होतं...

इतकं वाचून ती जरावेळ थांबली, कित्येक विचार मनावर ताबा घेऊ लागले... काही क्षणात तिच्या नजरेसमोर अंधार पसरला... काहीवेळ तिला कशाचीच जाणीव झाली नाही, पुढच्या क्षणाला तिला जरा प्रकाश दिसू लागला जसा एखाद्या अंधाऱ्या खोलीच्या दाराच्या फटीतून उजेड आत यावा तसा... ती उठून जवळ गेली तशी उभी रेष जास्त स्पष्ट झाली अगदी हातभर अंतर जवळ गेल्यावर हळूहळू दार बाजूला सारून तिने पूर्ण दरवाजा उघडला... तसा तिच्या नजरेसमोर लख्ख प्रकाश पसरला... तिला समोरच दृश्य पाहून कुण्या वेगळयाच दुनियेत आल्याचं जाणवलं...

तिने मनाला धीर देत एक एक पाऊल पुढे उचलले, ती बारकाईने लक्ष देत आजूबाजूला पाहू लागली... तिला गार वारा स्पर्शला, तिचा अंगावर शहारा आला,समोर अतिविशाल वृक्ष... उंचच उंच डोंगर, आभाळ जणू काही डोंगराला टेकलं असं तिला वाटलं, आजूबाजूला धुके पसरलेले... कितीतरी मोहक फुलांचे झाडं, वेली तितकीच सुंदर फुलपाखरं... तऱ्हेतऱ्हेचे पशु पक्षी तिला तिथे  दिसले... मोर, कोकिळा, कबुतर, हरीण, ससा, घोडे, हत्ती बरेच पण त्यांच्यात एक

वेगळेपण तिला दिसून आलं ते म्हणजे त्याचे डोळे जरा निळसर आणि अंगावर चमक... याआधी तिने कधीच न पाहिलेले असे ते दृश्य पाहून ती सुखावली पण दुसऱ्याच क्षणाला एकटे पणाची तिला जाणीव झाली... ती झपझप पावलं टाकत पुढे जाऊ लागली, कुणीतरी ओळखीचं दिसावं इतकंच तिला हवं होतं...

ती समोर जात असता, तिला आजूबाजूच्या वेलींचा स्पर्श झाला, त्यांचा सुगंध, ती चमक तिच्यात आली... बराचवेळ चालत आलेली ती थकली, जरा खाली वाकून तिने डोळे मिटले तसे काहीतरी सर्रकन तिच्या बाजूने गेल्याच तिने ऐकलं,तिने पटकन नजर फिरवली तसा एक साप तिला दिसला ती पळत सुटली, एक क्षण न थांबता, मागे फिरून न पाहता ती वेगाने धावत खूप दूर आल्याचं तिला कळलं तशी ती जागीच थांबली... त्या अनोळखी ठिकाणी असं एकाकी असतांना भयानक संकट उभे राहिले अन तिने भितीने, धावपळ केली, ती घामाने चिंब भिजली, तिचा श्वास जोरात सुरू झाला तसा खाली वाकून तिने दोन्ही हात गुडघ्यावर ठेवले अन त्या संकटातून तिची सुटका झाली... तिला बाजूलाच फळांची झाड दिसली, तिला भूक लागली असल्याने तिने काही फळं खाल्ली, ती जवळच एक झाडाला टेकून बसली , वाहणाऱ्या पाण्याच्या आवाजाने तिचं लक्ष वेधले, ती सावकाश जरा खबरदारी घेत बाहेर पडली, समोरच तिला नदीचा काठ दिसला, इतकं स्वच्छ पाणी आजवर न पाहिल्याच तिच्या मनात आले, ती ओंजळीने पाणी प्यायली... ' खूप चवदार असं पाणी ' ती स्वतःलाच म्हणाली... जरा मागे होऊन तिने उजव्या बाजूला पाहिले तर नदी सरळ दूरपर्यंत वाहत असल्याचं तिला दिसलं, समोर पाहिलं तर पुढे बरंच अंतर पार करून जावं लागेल तेव्हाकुठे पलीकडच्या काठावर पोहोचता येणार पण इकडून तिकडे जायला तिला काही साधन दिसलं नाही, मग तिने डाव्या बाजूला पाहिलं तर काही अंतरावर तिला धबधबा दिसला ज्याचं पाणी तिच्या समोरून वाहत चाललेलं... काय करावे तिला काही एक सुचत नव्हतं, नजर खालून वर करत ती धबधब्याचे पाणी पाहू लागलीं, वर एक दम टोकावर तिला एक मानव आकृती दिसली ती लगबगीने तिकडे निघाली...

ती पटापट पाऊल टाकत उंचावरून खाली पडणाऱ्या पाण्याजवळ पोहोचली... आजूबाजूला जणू धुकं दाटलेले, तिने नजर रोखून वर पाहिले तिचा डोळयांवर विश्वासच बसला नाही... तिने पुन्हा एकदा खात्री म्हणून धबधब्याच्या टोकावर उभ्या असलेल्या त्या आकृतीला पाहिले तिच्या काळजाचा ठोका चुकला... ती स्वतःशीच पुटपुटली ' कुमार '... आता तिला ओळख पटली तिने भान हरपून त्याला हाक मारली..."कुमार... कुमार..."

कुमार होता तसाच जागी उभा होता जणू तिने दिलेला आवाज त्याने ऐकलाच नाही... ती परत परत त्याला आवाज देत राहिली पण तिला काहीएक प्रतिसाद मिळाला नाही मग तिला समजलं की कदाचित उंचावरून खाली येणाऱ्या पाण्याच्या आवाजामुळे त्याला हाक ऐकायला जात नसेल... आता काय बरं करावं ती विचार करत असता अचानक कुमारचा तोल जाऊन तो खाली पडत असल्याचं दिसून आलं... अन ती जोरात किंचाळली"कुमार sssss"

तो पाण्यासह खाली येत होता... जसं पाणी मोठमोठ्या काळया दगडांवर आदळून समोर वाहत होत तसं कुमार इतक्या उंचावरून खाली पडला तर तिच्या मनात विचार आला आणि तिचा श्वास थांबला... पण ते सर्व तसंच पाहत राहिल्याशिवाय ती काहीही करू शकत नव्हती... आता तो मोठमोठ्या दगडांवर खाली पडणार समजताच तिने दोन्ही हाताने चेहरा झाकला... काही वेळ ती तशीच उभी राहिली, मन आवरत तिने हात बाजूला सारले तर तो एखाद्या अलौकिक शक्तीने हवेतच थांबलेला... ती चकित झाली, मनात भीती दाटली... हे काय घडते आहे तिला काहीही उमजत नव्हतं दुसऱ्या क्षणी तिला एक आणखी आश्चर्याचा धक्का बसला... कुमार हवेत जसा उभा होता तश्याच अवस्थेत त्याच्या पायाखालून वाहत जाणारं पाणी कारंजे उडवीत त्याच्या तळपायाला स्पर्श करून तिथं एक चौकोनी काच तयार झाली...

ती लगबगीने धावत जाऊन त्याच्या जवळ आली, पुढच्या क्षणी इतर पाच दिशेने म्हणजे कुमारच्या डावीकडून एक हिरव्या रंगाचे किरण आले अन तळहाताला स्पर्शले,

उजवीकडून एक पिवळया रंगाचे किरण आले अन तळहाताला स्पर्शले, मागच्या बाजूने एक काळया रंगाचे किरण आले अन त्याच्या पाठीला स्पर्शले, त्याच्या समोरून एक लाल रंगाचे किरण आले अन त्याच्या छातीला स्पर्शले, शेवटी आभाळातून एक निळया रंगाचे किरण आले अन त्याच्या केसांना स्पर्शले... या पाच दिशेने आलेल्या त्या वेगवेगळया किरणांचा कुमारला स्पर्श होताच त्याच्या भोवती काचेची हवाबंद खोली तयार झाली आणि तो जणू बंदिस्त झाला... ती वारंवार त्याला हाक मारत राहिली पण त्याचा काहीएक उपयोग होत नव्हता... तिने न राहवून बाजूलाच एक दगड उचलला, कुमार बंदिवान झालेल्या खोलीच्या दिशेने भिरकावला... काय आश्चर्य! दगडाने काच तुटली तर नाहीच उलट तोच दगड तिच्या दिशेने परत यायला लागला तिला काय करावं काही समजेना... तिला वाटलं बस्स संपलं सारं, दगड डोक्याला लागणार या भीतीने घामाच्या धारा कपाळावरून ओघळल्या ती पुरती घामाने चिंब भिजली...

कसलातरी परिचित आवाज तिला ऐकू आला तिने डोळे उघडले, जरावेळ पापण्या उघडझाप करून ती भानावर आली... नजरेसमोर गरगर फिरणारे पंख्याचे पाते, बाजूच्या खिडकीतून आत येणारी सूर्यकिरण, पाखरांचा किलबिलाट आणि  सकाळचे सहा वाजले असं सांगणारा मोबाईलचा गजर... डोळे उघडून पाच , दहा मिनिटं झाली तरी ती हालचाल करत नव्हती... ती हळूच हातावर जोर देऊन अंथरुणावर उठून बसली, डोकं जरा जड झाल्याचं तिला जाणवलं, दोन्ही हाताने चेहऱ्याच्या घाम पुसून तिने तोंडावर आलेले काही केस हातानेच मागे सारले... उजव्या हात कपाळाला लावून तिने कोपर मांडीवर टेकवला.. स्वतःशीच पुटपुटली ' ते जंगल,धबधबा, कुमार... काचेच्या खोलीत बंदिस्त '.. ते स्वप्न होत तर, पण या अश्या भलत्याच स्वप्नांचा काय अर्थ असावा?? अजून काही विपरीत घडणार कि काय? कुमार ठीक तर असेल ना? एकामागून एक असे कित्येक प्रश्न तिचं डोकं उठवू लागले... ती पुन्हा पुन्हा रात्रीचं ते स्वप्न आठवू लागली पण जसेच्या तसे काही तिला आठवेना... सरतेशेवटी ती खूप वैतागली, ती ताडकन बिछान्यावरून खाली उतरली... मोबाईल उचलताना तिची नजर डायरीवर पडली, काल रात्री डायरी वाचत असताना नकळत झोप लागली आणि पुढचं वाचायचं तसंच राहिलं.. तिला

आठवलं, पुढे काय लिहून ठेवलं असेल? अचानक तिच्या मनात विचार आला पण आता तिला रोजची काम आटपून जेवण तयार करायचं होतं, म्हणून तिने डायरी उचलून बाजूच्या छोट्या टेबलवर ठेवली... ती बेडरूम मधून बाहेर निघाली, लवकरच काम आटपून तिने दोघांकरिता चहा आणि नाश्ता बनविला, सोबत चहा नाश्ता घेतल्यावर तिने बाकीची काम आटोपली, मग आंघोळ करून तिने देवापुढे ज्योत पेटवली, डोळे मिटून आज पहिल्यांदाच तिने प्रार्थना केली... “देवा, कुमार लवकर बरा होऊ दे!”

ती देवघरातून बाहेर आली, घड्याळात ९:४५ वाजलेले...”माझा रुमाल कुठे आहे?”तिने कपाटातून रुमाल काढून त्याच्या हाती दिला आणि त्याला टिफिन देत दारात उभं राहून ' bey, have a nice day... ' म्हणाली...

तो दूर जाईपर्यंत ती त्याला पाहत राहिली, मग तो दिसेनासा झाला तिला एकटेपणाची जाणीव झाली... काही वेळातच पहाटे पहाटेचं ते स्वप्न तिला जास्त तीव्रतेने विचारमग्न करू लागलं... डोकं जास्तच दुखायला लागलं तसं तिने स्वतःला बाजूच्या खुर्चीत झोकून दिलं... विचारचक्र तसच फिरत राहिलं...

रात्री किंवा दिवस असतांना मनात जे काय विचार असतील ते स्वप्नरूपाने नजरेसमोर साकारतात असं मानलं जातं... मग पहाटे पहाटे पाहिलेलं स्वप्न खरं असतं किंवा स्वप्नात जे काय दिसलं तसंच काहीसं घडणार आहे या अतिलोकप्रिय विधानाचा नेमका काय अर्थ असावा???

## ३२. भेटीची ओढ

इकडे कुमारच्या घरी...

नवीन ठिकाणी तशी उशिराच झोप येते तर याबरोबरच कुमार आणि त्याच्या कुटुंबियांवर हि वेळ आली होती त्यामुळे सर्वांनाच दुःख झालं होतं... मग याप्रसंगी मन कश्यातच समाधानी नव्हतं तर झोप रोजच्यासारखी कुणालाच लागली नव्हती... गावात कोंबडा आरवला कि सर्व लोक जागी होतात, तशी सर्वांना जाग आली... सर्व उठून जागेवरच बसले... बऱ्याच दिवसांनी नजरेसमोर त्यांनी जरा वेगळा आणि मनमोहक देखावा ते पाहिला... तांबूस सूर्यकिरण नभनक्षी कामात बुडालेले, पाखरांची किलबिल सुरु झालेली, गुराढोरांना चारापाणी करून लोक कामात रमलेले, कुणी दुधाच्या धारा काढत असल्याचा झरझर असा आवाज, तर रस्त्यावरून ऐटीत चालणारे बैल आणि सोबतच जुंपलेली बैलगाडी, आजूबाजूच्या सर्व अंगणात सडा शिंपून रांगोळी काढलेली... हे असं रमणीय दृश्य पाहून त्यांना आपण कुठे आहोत आणि परिस्थिती काय आहे? याच भान हरपलं...

इतक्यात सकाळची सर्व कामं आटोपून, देवपूजा करून, हातात अगरबत्ती धरून त्या माउलीने तुळशीसमोर वाकून नमस्कार केला... मनोमन कुमार साठी प्रार्थना करून ती मागे वळली... तिला पाहून ते सर्व भानावर आले...

“बाळांनो उठले... झोप गेली?”ती हळूच म्हणाली...

त्यांनी होकारार्थी मान हलवली, उठून उभे राहिले... पटापट हातपाय, तोंड धुऊन घरात बसले, सोबत चहा घेतला... सुजितने वडिलांना फोन लावला...

“हॅलो बाबा”

“हॅलो बोल सुजित”

“कुमार आता कसा आहे?”

“तो झोपेतून उठला, नर्सने तपासलं, सगळं ठीक आहे म्हणे...”

“कुमार काही बोलला का?”

“आम्ही आत नाही गेलो... डॉक्टर आल्यावर त्याला भेटू...”

“बरं, काकांना फोन द्या...”म्हणत त्याने प्रशांतला फोन दिला..

“हॅलो बाबा, दादा कसा आहे आणि तुम्ही सगळे?”

“कुमार आत्ताच उठला आणि आम्ही ठीक आहोत...”

“बरं आईशी बोला...”

“हॅलो, अहो आता कुमार बरा आहे ना?”

“बरा आहे...”

“तुम्ही सर्वांनी चहा घेतला?”

“हो…”

तिने पदर डोळ्याला लावला आणि मोबाईल आर्यनला दिला…”हॅलो काका, काळजी करू नका”

"…”आर्यनने मोबाईल कानापासून दूर करत ' आवाज येत नाहीये.. ' मोबाईल अनिरुध्द ने घेतला…

“हॅलो…”

“हॅलो बोल सुजित..”

“काका मी अनिरुध्द”

“अच्छा, बोल ना…”

“डॉक्टर कधी येणार आहेत..?”

“१०:३० वाजता येतील..”

तो पुढे काही बोलणार इतक्यात ऋतुराजने मोबाईल इकडे दे असा इशारा केला…

"हॅलो काका, काही काळजीचं कारण नाही ना?"

"नाही... आता तो बरा आहे.."

"ठीक आहे काका, दवाखान्यात येण्यासाठी आम्ही लवकरच घरून निघतो.."

"ठीक आहे.."

"हो काका, फोन ठेवतो.."

त्याने फोन ठेवला... मोबाईल स्क्रीनवर ९:०० वाजलेले पाहून त्याने सगळ्यांकडे एक नजर फिरवली, आपण लवकर जे काय बाकीची कामं असतील ते पार पाडून निघायला पाहिजे...

काही वेळातच तीन दुचाकी घेऊन, एका दुचाकीवर ती माउली आणि सुजित, दुसऱ्या दुचाकीवर प्रशांत आणि आकाश तर तिसऱ्या दुचाकीवर आर्यन, ऋतुराज, अनिरुध्द दवाखान्याच्या रस्त्याने जायला निघाले... कुमार कसा असेल? हा प्रश्न सर्वांच्याच मनात होता...

या सगळ्यांपेक्षा जरा वेगळा विचार करत होता, तो म्हणजे अनिरुध्द...

"सोनेरी क्षण"हे नवीन रहस्य, गुपित काय आहे? कुमारने डायरी सोबतच असं काही लिहून ठेवल्याची कल्पना कुणालाच कशी नाही? त्यात त्याने काय काय लिहिलं असेल? या प्रश्नांनी त्याला भंडावून सोडले... कधी एकदा दवाखान्यात पोहोचतो आणि कुमारशी बोलतो, त्याला विनवून कधी डायरी अन सोनेरी क्षणांचा खुलासा करून घेतो असं त्याला वाटलं... कुमारच्या भेटीची ओढ प्रत्येक क्षणाला वाढतच गेली... तर आर्यन विचार करू लागला की आज

कुमारसोबत मनसोक्त बोलायचं, त्याला बोलतं करायचं... त्याला एक सांगाचंय कि"दोस्ता तू बरोबर होता, तुझं म्हणणं मला पूर्णपणे पटलं.."

ऋतुराजने दुचाकी चालवत जसे वाटेत येणारे दगड चुकवीत रस्त्यावर लक्ष ठेवले, मनात येणाऱ्या विचारांना तितक्याच कुशलतेने बाजूला करत तो समोर निघाला... त्याच्या मनात वारंवार आज ती डायरी काहीही झालं तरी मिळवायची म्हणून ती व्यक्ती कोण आहे? जिच्याकडून डायरी घ्यायची, म्हणून तिला भेटण्याची ओढ लागली.. अचानक दुचाकी पंक्चर झाली मग काय आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज दुचाकी दुरुस्त करून नंतर येतो ... तुम्ही समोर जा म्हणाले...

दोन दुचाकी घेऊन काही वेळातच ते दवाखान्यात पोहोचले... सगळे कुमारच्या रुमजवळ गेले तर तिन्ही वडीलमंडळी खुर्चीवर बसलेले... त्यांच्याशी बोलून फोनवर जे बोलणं झालं होतं त्याशिवाय वेगळं त्यांना काहीही ऐकायला मिळालं नाही... ते सर्व डॉक्टर येण्याची वाट पाहत बसले आणि घड्याळात १०:०० केव्हाच वाजले... थोडा वेळ तिन्ही वडील मंडळी तेथून बाहेर पडले, जवळ जवळ अर्धा तास तिथं शांतता पसरली... ठीक १०:३० वाजता डॉक्टर आले, त्यांनी लगेच कुमारला तपासलं... डॉक्टर रूममधून बाहेर येताच -

"कुमार बरा आहे ना?"तिने विचारले

"आधीपेक्षा त्याची प्रकृती आता चांगली आहे पण तो अजून काहीच बोलला नाही"

"का?"जवळपास सर्वांनी एकसाथ हा प्रश्न विचारला...

"बहुतेक त्याला बोलतांना त्रास होत असावा... असं मला वाटतं.."

“बाकी काळजीचं काही कारण नाही ना?”प्रशांत म्हणाला...

“नाही... ठीक आहे आपण नंतर भेटू, त्याला आरामाची गरज आहे...”म्हणत डॉक्टर इतर रुग्णांना तपासायला निघून गेले...

सुजितचा मोबाईल वाजला...
“हॅलो, बोल आर्यन”

“डॉक्टर आले का? कुमार कसा आहे?”

“डॉक्टर आले आणि त्यांनी कुमारला तपासलंसुध्दा, तो आता ठीक आहे...”

मध्येच मोबाईल हाती घेऊन अनिरुध्द”अरे सुजित, पंक्चरचं एकही दुकान मिळालं नाही, कितीवेळपासून पायी चालत आहोत...”

सुजितने त्यांना एका दुकानाचा पत्ता सांगितला, अजून काही अडचण आली तर सांगा... नाहीतर थोड्या वेळाने मी फोन करतो, बरं... फोन ठेवतो म्हणत त्याने फोन कट केला...

मला काही सांगाचंय... भाग ४

लवकरच येत आहे.

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. प्रफ़ुल शेजव यांचं हे तिसरं पुस्तक.**

प्रकाशक मिळत नसल्यामुळे लेखनाकडे दुर्लक्ष करणारे प्रफ़ुल शेजव यांच्यासारखे अनेक प्रतिभावान लेखक असतात. नवीन लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात.

यावर ई साहित्य हा उपाय आजकाल पॉप्युलर होत आहे. अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुलसारखेच, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणुक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत<br>
ई साहित्य प्रतिष्ठान